





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. ०४.०९.२०२४ | अंक नं. १५८ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020







# वरिष्ठ अधिकाऱ्यांनी झोपेचे सोंग घेतल्याने नगर शहरात वाहतूक व्यवस्थेचा ‘बोजवारा’

## स्कूल व्हॅन, रिक्षांवर हप्तेखोरीच्या इराद्याने होतेयं कारवाई, सुधारणा न झाल्यास उपोषणास बसणार

नगर – पोलिस दलासह शहर वाहतूक शाखा आणि उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी झोपेचे सोंग घेतल्याने आज शहरासह जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्थेचा पुरता ‘बोजवारा’ उडाला आहे. नगरच्या शहर वाहतूक शाखेला तर ‘हप्तेखोरी’ची किड लागली असून, हप्ते देणाऱ्या रिक्षांना मोकळीक आणि हप्ते न देणाऱ्या रिक्षा, शाळकरी मुलांची वाहतूक करणाऱ्या ‘व्हॅन’वर कारवाईचा बडगा उगारला जात आहे. या हप्तेखोरीमुळे रिक्षा, व्हॅन चालक त्रस्त झाले आहेत. एकीकडे हप्त्यासाठी कारवाई केली जात असताना दुसरीकडे बेशिस्त वाहतुकीला शहर वाहतूक शाखेकडून अभय मिळत आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख चौकांसह लहान-सहान गल्लीबोळातील बाजारपेठेतील रस्त्यांवर वाहतूक कोंडीचा सामना सर्वसामान्य जनतेला करावा लागत आहे. या अनियंत्रित, बेशिस्त कारभाराला जबाबदार कोण? यासंदर्भात तात्काळ कार्यवाही न झाल्यास थेट आमरण उपोषणास बसण्याचा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष मनोज साळवे यांनी दिला आहे.

यासंदर्भात साळवे म्हणाले की, नगर शहरातील वाहतूक व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे. वाहतूक नियंत्रण शाखेचे कर्मचारी कुठेच दिसत नाही. शहरातील कापड बाजार, चितळे रोड, नवीपेठ, दाळमंडई, तेलीखुंट, रामचंद्र खुंट, दिल्लीगेट या भागात मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. हा भाग बाजारपेठेचा असल्याने येथे नेहमीच मालाच्या गाड्या खाली होत असतात. अशावेळी रस्त्यावरील वाहतूक नियंत्रणासाठी अशा भागात वाहतूक पोलिस तैनात असणे आवश्यक आहे. मात्र वाहतूक पोलिस कोठेच दिसत नाही. त्यामुळे बाजारपेठेच्या या भागात नेहमीच वाहतूक कोंडी होते. सर्वसामान्य नागरिकांना रस्त्यावरून चालणेही कठीण होते. वाहतुकीला अडथळे





विद्यार्थी बसलेले असतानाही रिक्षा ताब्यात घेऊन त्यात बसून ती वाहतूक शाखेच्या कार्यालयात नेताना वाहतूक पोलिस पहिल्या छायाचित्रात तर प्रतिबंध असतानाही शहरातून बिनदिक्कतपणे सुरू असलेली अवजड वाहतूक दुसऱ्या छायाचित्रात. (छाया – बबलू शेख)

निर्माण होऊन त्यात नागरिकांचा मोठा वेळ वाया जातो. अशावेळी वाहतूक पोलिसांची काही जबाबदारी आहे की नाही? असा सवाल साळवे यांनी केला आहे.

### अवजड वाहतुकीला शहरात परवानगी कशी?

शहराच्या बाहेरून बाह्यवळण रस्ता काढण्यात आल्यानंतर अवजड वाहनांना शहरातून ये-जा करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. मात्र हा नियम केवळ कागदावरच राहिला आहे. बाह्यवळण रस्त्यावर प्रत्येक चौकात दोन वाहतूक पोलिस दिवसभर बसून ठेवलेले असतात. मग त्यांच्यासमोर अनेक अवजड वाहने शहरात प्रवेश कसे करतात? हाही एक प्रश्नच आहे. पैसे घेऊन या अवजड वाहनांना शहरात प्रवेश दिला जात असल्याचे अनेकदा समोर आलेले आहे. मात्र पैसे घेणाऱ्या आणि देणाऱ्यांवर अद्यापपर्यंत कारवाई झाल्याचे ऐकिवात नाही. अवजड वाहनांमुळे शहरातील रस्त्यांवर अनेकदा वाहतूक कोंडी, अपघाताच्या घटना घडल्या असून, त्यात नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. तरीही वाहतूक शाखेचे वरिष्ठ अधिकारी आणि पोलिस अधीक्षकांनीही या गंभीर बाबीकडे लक्ष दिलेले नाही, ही दुर्दैवाची बाब आहे, असे साळवे म्हणाले.

### ‘हप्ता’ देणाऱ्या रिक्षांना १० सीट बसवण्यास परवानगी

वाहतूक शाखेला जे रिक्षाचालक हप्ता देतात, त्यांना रिक्षात १० सीट भरण्यासही परवानगी मिळते. त्यांनी परवानगीपेक्षा अधिक प्रवाशी रिक्षात कोंबले तरीही कोणताही अधिकारी आणि कर्मचारी त्याच्यावर कारवाई करत नाही. मात्र ‘हप्ता’ न देणाऱ्या रिक्षा चालकावर परवानगीपेक्षा कमी प्रवाशी बसवलेले असले तरी काही तरी त्रुटी काढून त्याच्यावर कारवाई करण्यात येते. मग अशी कारवाई का? हप्ता देण्यास रिक्षा चालकाला भाग पाडणे हाच त्यामागचा हेतू असल्याचे साळवे यांनी म्हटले आहे. सध्या शहर वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांकडून स्कूल व्हॅनवर कारवाईची मोहिम राबविली जात आहे. या कारवाईतील गंभीर बाब म्हणजे वाहतूक पोलिस थेट शाळेच्या आवारात जाऊन स्कूल व्हॅनचे फोटो काढतात. पीयुसी, विमा आहे का? अशी विचारणा करतात. यापैकी एक जरी कागदपत्र नसले तरी स्कूल व्हॅन, रिक्षात स्वतः बसून ती थेट वाहतूक शाखेच्या कार्यालयात आणून त्यावर दंडाची अथवा गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली जाते. हा सर्व प्रकार विद्यार्थ्यांच्या समोरच चालतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. याहूनही गंभीर प्रकार म्हणजे रस्त्याने जात असलेली स्कूल व्हॅन अथवा रिक्षा अडवली जाते. शाळेच्या वेळेत विद्यार्थ्यांना पोहच करणे गरजेचे असते.

त्यामुळे पोलिसांनी अडवले तरी व्हॅन, रिक्षाचालक थांबत नाहीत. त्यावेळी वाहतूक पोलिस या व्हॅन, रिक्षांचा पाठलाग करतात. वाहन पकडून विद्यार्थ्यांसह वाहतूक शाखेच्या कार्यालयात घेऊन जातात. अशावेळी विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होणारी भीती, या कारवाईचा विद्यार्थ्यांच्या मनावर होणारा परिणाम याकडे पोलिस दुर्लक्ष करतात. ही गंभीर बाब असून, अशा शाळेच्या वाहनाचा पाठलाग करताना कदाचित एखादा अपघात घडला आणि अनर्थ झाला तर त्याला जबाबदार कोण? या गंभीर बाबीची दखल कोणी घेणार आहे की नाही. पोलिस खाते, वाहतूक शाखा आणि आरटीओ कार्यालयावर शासनाचा काही वचक आहे की नाही? अधिकारी, कर्मचाऱ्यांची मनमानी अशीच सुरू राहिल्यास सर्वसामान्य रिक्षा, व्हॅनचालक आणि नागरिकांना न्याय मिळविण्यासाठी थेट आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात येई, असा इशारा साळवे यांनी दिला आहे.



















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## गर्भ रेशमी स्वरांचा सन्मान- प्रा. प्रविण दवणे

ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना यंदाचा भारतरत्न लता मंगेशकर पुरस्कार जाहीर होणे हा त्यांच्या आजवरच्या कारकिर्दीचा यथोचित सन्मान आहे.

अनुराधाजींच्या समर्पित वृत्तीचे एक उदाहरण सांगतो, एकदा त्यांचा फोन आला. ''प्रविणभाऊ तुम्हाला पांडुरंगाच्या चार चार ओळींच्या रचना लगेच लिहून द्यायच्या आहे. या कॅसेटचं उद्या रिलीज आहे व परवा आषाढी एकादशी आहे. मी स्टुडिओतच आहे.'' असं सांगतांना त्यांनी एक विशिष्ट चाल, त्या चालीचा एक रूपबंध गुणगुणुन दाखवला व याच मीटरवर लिहायचं असल्याचं सांगितलं.

मी लगेचच होकार कळवून चार चार ओळींची चार कडवी लिहिली. त्या काळात मोबाईल नव्हते. मी एका विद्यार्थ्याला ती कडवी फॅक्स करायला सांगितले. त्यांनी ती ताबडतोब गायला घेतली. तोपर्यंत पुन्हा पुन्हा कडवी पोहोचवली. ८८ कडवी पाठवली. त्यातून तब्बल ४४ गाणी त्यांनी गायली. मी १२ ते ४ गाणी पाठवली. सायंकाळी रेकॉर्डिंग पार पडले. दुसऱ्या दिवशी ती कॅसेट रिलीज झाली. यातून माझ्या जिद्दीपेक्षाही अनुराधाताईंचं समर्पण अधिक मोलाचं.

आमच्या आजवरच्या सुरेल प्रवासातील ही अविस्मरणीय आठवण. आम्ही जवळपास चाळीस संगीतकारांकडे ३०० हून अधिक गाणी एकत्र केली आहेत. अशा या स्वरलाघव अनुराधाजींना हा सन्मान मिळाल्याचा मनापासून आनंद होत आहे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



# नगर शहर व उपनगर परिसरातील गणेश विसर्जन विहिरींची तपासणी

### स्वच्छतेसह विहीरीवरील जाळ्यांची दुरुस्ती, सुरक्षेच्या उपाययोजना करण्याचे आयुक्तांचे आदेश



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेसह विहिरीवरील जाळ्यांची दुरुस्ती, सुरक्षा योजनांची पाहणी करताना मनपा आयुक्त यशवंत डांगे आदी. (छाया - लहू दळवी)

नगर - गणेशोत्सव तीन दिवसांवर आला आहे. शहरात काही गणेशभक्त व भाविकांकडे दीड दिवस, पाच दिवसांचे गणपती असतात. त्यामुळे सर्व विसर्जन विहिरींची तत्काळ स्वच्छता करा. विहिरीतील गाळ काढून तेथे पाणी कमी असल्यास पाण्याची व्यवस्था करा, असे आदेश आयुक्त यशवंत डांगे यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिले

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयुक्त यशवंत डांगे यांनी बुधवारी सकाळी शहर व उपनगर परिसरात गणेश मूर्तींचे विसर्जन होणाऱ्या विहिरींची समक्ष पाहणी केली. प्रत्येक विहिरीची स्वच्छता करून तेथील गाळ काढून घ्यावा. त्यात पाणी कमी असेल, तर पाण्याची व्यवस्था करून पाणी सोडावे.

विसर्जनाच्या दिवशी विहिरींजवळ मोठी गर्दी होते. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडू नये, यादृष्टीने सुरक्षेच्या उपाययोजना करा. विहिरींवरील जाळ्यांची तपासणी करून आवश्यक असेल तेथे तत्काळ दुरुस्त्या करून घ्याव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या.

घरगुती गणपती व छोट्या गणेश मुर्तींसाठी स्वतंत्र हौद केले जातात. यावर्षीही त्याचे नियोजन करून त्याची ठिकाणे निश्चित करा. विसर्जन स्थळी निर्माल्य टाकण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था ठेवा. साचलेले निर्माल्य घेऊन जाण्यासाठी, मोठ्या गाड्यांमध्ये भरण्यासाठी गाड्यांची व्यवस्था करा. विहिरींसह विसर्जन स्थळी, परिसरात स्वच्छता करावी, असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करा

### आपदग्रस्तांना मदत उपलब्ध करून देण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विभागीय, जिल्हा प्रशासनाला सूचना

मुंबई - विशेषतः मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. यासह मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या विदर्भासह इतर भागातील जिल्हे किंवा तालुक्यांमध्ये नुकसानीचे पंचनामे आणि मदतीची कार्यवाही त्वरित करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

पिकांचे झालेले नुकसान, घरांची पडझड, पशुधनाची हानी अशा सर्व बाबींची माहिती घेण्यात यावी, यासंदर्भात त्वरित पंचनामे करण्यात यावेत. अतिवृष्टीमुळे तात्पुरते स्थलांतर केलेल्या लोकांना सर्व आवश्यक सुविधा देण्यात याव्यात. त्यांना आवश्यक ती सर्व मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना दिल्या आहेत.

विभागीय आयुक्त, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, स्थानिक नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, पोलीस प्रशासन आदी सर्वांनी समन्वयाने यासाठी कामकाज करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास खुला ठेवावा, याद्वारे मदत आणि पुनर्वसनाचे सनियंत्रण करावे, स्थलांतर केलेल्या लोकांसाठी चांगल्या दर्जाचे तात्पुरते निवारे उभे करावेत, त्यांना कपडे, अन्न, शुद्ध पाणी, औषधे इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा ताबडतोब पुरवठा करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

पाटबंधारे विभाग, हवामान खाते यांच्याशी समन्वय ठेवून लोकांना आवश्यक माहिती त्वरित द्यावी. आपतग्रस्त लोकांच्या मदतीसाठी आपत्कालीन हेल्पलाइन आणि कंट्रोल रूम त्वरित कार्यरत करावी. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता शाळा आणि महाविद्यालयांसंदर्भात स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने निर्णय घ्यावेत. त्याचबरोबर पाऊस परिस्थिती, बाधित क्षेत्र, धरणांमधील पाणी पातळी, स्थलांतरित लोकांची संख्या, झालेल्या नुकसानीची माहिती इत्यादी माहिती त्वरित वेळोवेळी सादर करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिल्या आहेत.

# एससी व एसटी यांचे उपवर्गीकरण व क्रीमिलेयरचा दिलेला निकाल रद्द व्हावा

### चर्मकार विकास संघाचे केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी



एससी व एसटी यांचे उपवर्गीकरण व क्रीमिलेयरचा दिलेला निकाल रद्द करावा, अशा मागणीचे निवेदन चर्मकार विकास संघाच्यावतीने केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना देताना प्रदेशाध्यक्ष संजय खामकर आदी.

नगर - सर्वोच्च न्यायालयाने एससी व एसटी यांचे उपवर्गीकरण व क्रीमिलेयरचा दिलेला निकाल रद्द होण्यासाठी चर्मकार विकास संघाच्या वतीने केंद्रीय राज्य सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांना प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांनी निवेदन दिले.

१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने एससी व एसटी यांचे उपवर्गीकरण व क्रीमिलेअर लागू करण्याचा अधिकार राज्यांना दिला आहे. या संदर्भात एससी व एसटी समाज भयभीत असून सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने मोठी नाराजी पसरली आहे. हा निकाल एससी व एसटी समाजावर अन्यायकारक व समाजा-समाजात दुरावा निर्माण करणारा असल्याचा आरोप चर्मकार विकास संघाच्या वतीने करण्यात आला आहे.

हा निकाल एससी व एसटी यांच्यात कटुता निर्माण होऊन एससी, एसटी समाजाच्या विभाजनास खतपाणी घालणारा ठरणार आहे. या निकालचे गांभीर्य ओळखून या निकाला संदर्भात तात्काळ केंद्रीय विशेष अधिवेशन बोलावून सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल एकमताने रद्द करावा व एससी एसटी यांच्यावर झालेल्या अन्यायाला न्याय देण्याची मागणी चर्मकार विकास संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष संतोष कानडे, युवा गटई जिल्हाध्यक्ष रुपेश कांबळे, संतोष कांबळे, दिलीप कांबळे उपस्थित होते.

## तपोवन रोड येथून मोटारसायकलची चोरी

नगर -सावेडी उपनगरातील तपोवन रोड वरील राधेश्वरी रेसिडेन्सी या इमारतीच्या पार्किंग मध्ये लावलेली होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटारसायकल (क्रं.एम.एच.१६ सीएम ३५०४) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.३) सकाळी उघडकीस आली आहे.

याबाबत संजय शंकर चेमटे (रा. राधेश्वरी रेसिडेन्सी, तपोवन रोड) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०५ (बी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## वाडिया पार्क येथून मोटारसायकलची चोरी

नगर -शहरातील वाडिया पार्क परिसरात मोबाईल शॉपी समोर लावलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्रं.एम.एच.१६ झेड८१५६) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.

याबाबत शिवाजी विठ्ठल भालसिंग (रा.वाळकी, ता.नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०५ (बी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# नगर-दौंड महामार्गावर मालट्रक-कारचा समोरासमोर भीषण अपघात

### एक जण जागीच ठार तर चौघे जखमी; हिवरे झरे शिवारातील घटना



नगर-दौंड महामार्गावर हिवरे झरे शिवारात मालट्रकच्या धडकेत कारची झालेली दुर्दशा छायाचित्रात दिसत आहे.

नगर - नगर-दौंड महामार्गावर हिवरे झरे (ता.नगर) गावाजवळ बुधवारी (दि.४) सकाळी ८ च्या सुमारास मालट्रक आणि मारुती सुझुकी कंपनीची इरटीगा कार यांचा समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला तर कार मधील अन्य चौघे जण जखमी झाले आहेत. मयत व जखमी हे सर्वजण छत्रपती संभाजी नगरचे रहिवासी आहेत.

आदेश डाकरे (वय २७) असे मयताचे नव असून मयूर कुदळे, अभिजित बच्छिरे, हरीश घडामोडे व समरजित मनसिरे असे जखमींची नावे आहेत. हे सर्वजण मारुती सुझुकी कंपनीच्या इरटीगा कारने (क्र. एम.एच.२० ई वाय १०१२) नगरहून दौंड कडे जात होते. सकाळी ८ च्या सुमारास हिवरे झरे (काळे वाडी) शिवारात १४ मैल जवळ दौंड कडून भरधाव वेगात नगरकडे येत असलेल्या मालट्रक ची (क्र. एच आर ५५ व्ही ४४७८) आणि कारची समोरासमोर जोराची धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की कारचा चक्काचूर झाला.

अपघातात कार मधील जखमी अडकून पडले होते. त्यांना बाहेर काढण्यासाठी स्थानिक नागरिक नारायण रोडे, तुषार पवार, शैलेश काळे, पिंटू काळे, नितीन काळे, बापू काळे, राहुल काळे, सुभाष काळे यांनी तातडीने धाव घेतली. बराच वेळ प्रयत्न केल्या नंतर मयत व जखमींना कारच्या बाहेर काढण्यात यश आले. या अपघाताची माहिती मिळाल्यावर शिवसेनेचे उप जिल्हा प्रमुख संदेश कार्ले हे ही तातडीने तेथे दाखल झाले. त्यांनी रुग्णवाहिका तसेच वाहने रस्त्याच्या बाजूला काढण्यासाठी क्रेन बोलावले. स्थानिक नागरिक व कार्ले यांनी जखमींना उपचारासाठी तातडीने रुग्णवाहिकेतून नगरला पाठविले.

नगर तालुका पोलिसांना अपघाताची माहिती मिळाल्यावर पोलिस उपनिरीक्षक अस्लम पठाण, हे.कॉ. राहुल द्वारके यांनी तसेच महामार्ग पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मालट्रक चालक सलीम मोहंमद (रा. मणिपूर) याला ताब्यात घेतले आहे.

नगर-दौंड महामार्गावर बाबुर्डी बेंद फाट्यावर मागील आठवड्यात खाजगी आराम बस उलटून भीषण अपघात झाला होता. त्यात दोघांचा मृत्यू तर ५-६ प्रवासी जखमी झाले होते. ही घटना ताजी असतानाच बुधवारी सकाळी पुन्हा एका भीषण अपघात झाल्याने नगर दौंड महामार्ग मृत्यूचा सापळाच बनला आहे.

### महामार्गावरील खड्ड्यांमुळे पुन्हा एक बळी

नगर-दौंड महामार्ग मृत्यूचा सापळा बनत चालला आहे. महामार्गावरील खड्ड्यांमुळे पुन्हा एकाचा बळी गेला आहे. मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यात पावसाळा सुरू असल्याने प्रवाशांच्या अडचणीत अधिकच भर पडत असून, अपघातही वाढले असल्याने तातडीने या महामार्गावरील खड्डे बुजवावेत, अन्यथा आगामी काळात मोठे अंदोलन छेडले जाईल असा इशारा शिवसेना उपजिल्हा प्रमुख संदेश कार्ले यांनी दिला आहे.

# कोठला परिसरात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर - नगर शहरातील कोठला परिसरात नगर ते छत्रपती संभाजी नगर जाणाऱ्या रोडवर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि.४) सकाळी ६.३० च्या सुमारास घडली. नंदकिशोर माधवसिंह परदेशी (वय ६७, रा. डावरेगल्ली, नगर) असे मयताचे नाव आहे.

मयत परदेशी हे सार्वजनिक बांधकाम विभागातून सेवानिवृत्त झालेले होते. ते सकाळी ६.३० च्या सुमारास नगर ते छत्रपती संभाजी नगर जाणाऱ्या रोडने दुचाकीवर डीएसपी चौकाच्या दिशेने जात असताना इदगाह मैदानाजवळ पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. त्यामुळे ते रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाले.

परिसरातील नागरिकांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले. याबाबतची माहिती भिंगार कॅम्प पोलिसांना देण्यात आली असून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. नातेवाईकांनी फिर्याद दिल्यानंतर अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. अधिक तपास पोलिस अंमलदार महेश विधाते हे करीत आहेत.

# कत्तलीसाठी जनावरे घेवून चाललेली ४ वाहने पकडली; कोठला परिसरात कारवाई

नगर - कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे घेवून चाललेली ४ वाहने शहर वाहतूक शाखेच्या पथकाने कोठला परिसरात पकडली आहेत. बुधवारी (दि.४) सकाळी ६ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली असून ५ जणांवर गुन्हा दाखल करत ६६ लहान मोठ्या जनावरांची सुटका करण्यात आली आहे.

याबाबत शहर वाहतूक शाखेतील स.फौ.मन्सूर सय्यद यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शहर वाहतूक शाखेचे पथक शहरात गस्त घालत असताना कोठला परिसरात सकाळी ६ च्या सुमारास ३ महिंद्रा कंपनीचे पिकअप व १ सुझुकी कंपनीचा कॅरी पिकअप अशी ४ वाहने संशयास्पद रित्या जाताना आढळून आली. पोलिस पथकाने ही चारही वाहने अडवून पाहणी केली असता त्यात सुमारे ६६ लहान मोठी गोवंश जातीची जनावरे दाटीवाटीने भरलेली आढळून आली.

पोलिसांनी ही वाहने तोफखाना पोलिस ठाण्यात नेली. तेथे स.फौ. मन्सूर सय्यद यांनी दिलेल्या फिर्यादी वरून जनावरे कत्तली साठी घेवून जाणाऱ्या वासिम इसाक सय्यद (रा.खाटिक गल्ली, राहुरी), आतिक लतीफ कुरेशी (रा. इस्माईलनगर, राहुरी), सुलतान एतुद्दिन मदारी (रा. इस्लामपुरा, शिरूर, जि. पुणे), जमील अब्दुल सय्यद (रा. घासगल्ली, कोठला), इरफान शेख (रा.कोठला) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यातील चौघांना ताब्यात घेतले आहे.



कत्तलीसाठी जनावरे घेवून चाललेली ४ वाहने पकडल्यानंतर आरोपींसह शहर वाहतूक शाखेचे पथक.

## रवि केवटे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - शिक्रापूर शिरुर येथील रवि केवटे (वय ५२) यांचे ४ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर शिक्रापूर येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. श्रीनिध ग्राफिकचे ते संचालक होते. त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. अर्जुन केवटे यांचे ते वडील होत.

## मुकुंदराव खोले यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील टेलरिंग व्यावसायिक मुकुंदराव वसंतराव खोले (वय ८४) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, दोन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. टेलरिंग व्यावसायिक रमेश खोले, रामराव खोले व राजेंद्र खोले यांचे थोरले बंधू, गिरमे चौकातील कृष्णा नाष्टा सेंटरचे मालक गणेश खोले, सागर, सोमनाथ व संतोष खोले यांचे चुलते होत.

# शिक्षक दिन!

आज ५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. १९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरु झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील.

आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरू शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरू हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे आपले कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरु विद्यादान करत असे. शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वोच्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वोच्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरू शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही. आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते. मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते. १९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले. शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२ पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली.

आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

# गृहिणी

## आरोग्य

### तंदुरुस्तीसाठी भुजंगासन

जमिनीवर सतरंजी घालून पोटावर झोपा. दोन्ही हात मुडपून छातीच्या रेषेत ठेवा. आता हळूहळू मानेपासून कमरेपर्यंत भाग उचला. दोन्ही पाय जोडलेल्या स्थितीत असू द्या. काही श्वासानंतर हळूहळू खाली या. पुन्हा हीच क्रिया ४ ते ५ वेळेस करा. याला 'भुजंगासन' म्हणातात. याने मानेपासून कमरेपर्यंतच्या मणक्यांचा व्यायाम होतो. मान, पाठ व कंबर यांचे दुखणेही कमी होते.

## पाककला

### पनीरची खीर

**साहित्य :** पनीर, साखर, बेदाणे, पिस्ते, बदाम, केशर अगर केशरी रंग, मैदा

**कृती :** पनीरमध्ये थोडा मैदा मिसळून पनीर चांगले दाबून ठेवावे. अर्ध्या तासानंतर पनीर काढून त्याचे लहान लहान तुकडे कापावेत. एका पातेल्यात दूध व साखर घालून आटवावयास ठेवावे.

दूध आटत आल्यावर त्यात बेदाणे, पिस्ते आणि बदाम यांचे काप व केशर अगर केशरी रंग घालावा. दूध जरा घट्ट होताच त्यात पनीरचे कापलेले तुकडे घालावेत व दूध पुन्हा चांगले उकळू द्यावे. बासुंदीरसारखे घट्ट होताच खाली उतरवून घ्यावे व वेलदोड्यांची पूड घालावी.

## वास्तू

### भावांनी वेगळे राहायचे असल्यास

* एका घरात दोन भावांनी वेगळे रहायचे असल्यास लहान भावाने पूर्व भागात तर मोठ्या भावाने पश्चिम भागात राहणे योग्य असते.

* प्रत्येक घरातील पूर्व भाग श्रेष्ठ म्हणून पूर्व भागात राहणारे चांगल्या स्थितीत असतात.

## सल्ला

भात शिजत असताना दोन-तीन चमचे तुप घातल्याने भात मोकळा होतो.

## सौंदर्य

काही जणांचा चेहराच गोरा किंवा उजळ दिसतो. हात, पाय मात्र गोरे दिसत नाहीत. अशावेळेस हात व पाय यांना क्लीझिंग लोशनने रोज स्वच्छ करावे.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ५ सप्टेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, हस्त अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**वृषभ :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन :** जुने मित्र भेटतील. दिवस आनंदात जाईल.

**कर्क :** आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी विधायक ठरेल.

**सिंह :** बेपर्वाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते.

**कन्या :** आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील.

**तूळ :** आपल्या आर्थिक बाबतीत एखादा विरोध करेल.

**वृश्चिक :** अधिकार क्षेत्रात वाढ होईल. मुलांसाठी वेळ द्याल.

**धनु :** आनंदाची बातमी मिळेल. मानसन्मानात वाढ होईल.

**मकर :** वाहने चोरी होण्याची शक्यता आहे. पाकीटमारी होईल.

**कुंभ :** दिवस आनंदात जाईल मात्र शेजाऱ्याशी वाद होतील.

**मीन :** मागील उधारी-उसनवारी वसुल होईल. पत्नीसौख्य लाभेल.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### नावासाठी

देवळात भजन चालू होतं. उन्हाळ्याचे दिवस होत, पंखा चालू होता. इतक्यात एक माणूस आला व त्याने पंखा बंद केला. लोकांनी त्याला विचारले,
'पंखा बंद का केलास ?'
'मी तो देवळाला देणगी म्हणून दिलाय. माझ नावही पंख्यावर लिहिलंय. हा पंखा असा चालू राहिला तर माझं नाव कुणाला तरी दिसेल का? म्हणून बंद केला'.


## ...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

* विद्युत प्रवाह मोजण्याचे परिमाण - ॲम्पीअर
* सँडर्स या इंग्रज अधिकाऱ्याचा खून करणारा भारतीय - मदनलाल धिंग्रा
* कर्नाळा पक्षी अभयारण्य असलेला जिल्हा - रायगड
* अण्णा हजारे २०१८ मध्ये उपोषणास बसले होते ते मैदान - रामलिला मैदान

**संदर्भ - 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक**
**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७००४

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) पुरुषाचे एक नाव ४) माणसांचा समुदाय; सोसायटी ७) कवितेत तुझे ८) एक प्राणी; मार्जार; वाघाची मावशी ९) एक प्राणी; मासा; बारा राशींपैकी एक १०) लागून; जवळ १३) एक सुगंधी वनस्पती १५) संमती; दुजोरा १८) एक प्रसिद्ध उद्योगपती (आडनाव) २०) पत; ओंजळ २१) ओढा वगैरेंवर बांधलेला तात्पुरता पूल २२) अंघोळ न केलेला; शिळा २४) धोतरजोडीतील एक भाग; पर्ण २५) एक फूल; पंकज; राजीव; नीरज

शब्दगंध क्र. ७००३ चे उत्तर



**उभे शब्द :-** १) वृत्त; वार्ता; खबर; समाचार २) आयुष्य; उमर; पाणी; जल ३) झाडाच्या सालीचे वस्त्र ४) सारख्या अंतरावरचा ५) कैफ; नशा; मद ६) अगदी जखखड म्हातारा ११) जाणे; प्रस्थान करणे १२) जपानी कुस्तीचा एक प्रकार १४) भाग; हिस्सा १५) अशा प्रकारचा; असला १६) तोटा; हानी १७) पसरलेला सुगंध १९) नाणी पाडण्याचा कारखाना २२) साखर वगैरेचा कढविलेला रस; शुद्ध; शिजविलेले अन्न २३) इटलीची राजधानी; अंगावरील बारीक केस; लव

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** मुले ही घरातील अलंकार आहेत.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### शिलाजीत म्हणजे काय?

शिलाजित भारतीय उपमहाद्वीपाच्या हिमालय व हिंदुकुश घाटींमध्ये नैसर्गिकरीत्या आढळणारे खनिज पदार्थ आहे. रोप आणि रोप पदार्थांच्या हजारो वर्ष विघटन झाल्याने बनलेले एक दुर्लभ रेसिन आहे. हे अडकलेले रोप पदार्थ खडकांच्या बाहेर येऊन तपकिरीसदृश ते काळे चिकट डिंकासारखे पदार्थ बनवते. भारतीय पारंपरिक औषध प्रणाली म्हणजेच आयुर्वेदात हजारो वर्ष त्याच्या आरोग्य निर्माण गुणधर्मांसाठी शिलाजितचे वापर होत आले आहे.

**शिलाजितचा आयुर्वेदिक उपयोग :** शिलाजितमध्ये अनेक उपचारक लाभ असले, तरी सर्वात महत्वाचे म्हणजे ते आरोग्य टॉनिक म्हणून ओळखले जाते. चांगल्या आरोग्यास वाव देण्यात शिलाजितचे काही फायदे आपण पाहू या.

**वजन कमी करण्यास मदत करते :** वैद्यकीय अभ्यास दर्शवतात की शिलाजितमध्ये काही सक्रिय यौगिके असतात, जे शरीर भार सूचकांक वाढवून वजन आणि कंबरेचे व्यास कमी करण्यास मदत करतात.

**बद्धकोष्ठता कमी होते :** शिलाजितचे शरिरावर काही टॉनिक प्रभाव असतात, जे आतड्याच्या स्नायूंना बळकट करतात आणि बद्धकोष्ठतेत आराम देऊन तुमच्या शरिरातून पचन आणि अन्न बाहेर पडण्यास मदत करतात.

**शुक्राणूंची संख्या वाढवते :** शिलाजित जवळपास दीड महिना नियमित घेतल्यास, फॉलिकल संप्रेरक हार्मोन वाढवून शुक्राणू यौगिके सुधारण्यात प्रभावी असल्याचे आढळले आहे.

शिलाजित उंच जागेच्या समस्यांसाठी एकमुखी समाधान आहे. ते न केवळ तणाव आणि चिंतेमधून आराम देते, तर शिलाजित फुफ्फुसांच्या समस्या आणि हायपॉक्सिआ कमी करण्यात मदतशीर आहे.

**रक्तक्षयाला उलटते :** शिलाजित लौहाचे एक चांगले स्त्रोत आहे, जे हीमोग्लोबिन आणि लाल रक्तकोशिका वाढवण्यात मदतशीर असते. टॉनिक असल्यामुळे, ती अशक्तता आणि रक्तक्षय झालेल्या लोकांमध्ये थकवा कमी करते.

**अल्झायमरची प्रगती कमी करते :**

संशोधनाचे पुरावे दर्शवतात की शिलाजित मधील फ्युल्व्हिक एसिड मेंदूमध्ये ताण प्रथिन अधिक साचणे टाळते, जे इतरत्र न्यूरोडेजेनरेशन आणि अल्झायमर्ससाठी जवाबदार आहे. तथापी, या लाभाची पुष्टी करण्यासाठी अधिक अभ्यासाची गरज आहे. **पोटाचे अल्सर टाळते :** शिलाजित गॅस्ट्रिक गळती थांबवते आणि पोटाच्या किनारीला कडक करते, व अल्सर निर्माण होणे टाळते.

## अंतर्ज्ञान

दोघे मित्र एका गणपतीच्या देवळात दर्शनासाठी आले होते. देवळाच्या गाभाऱ्यात एक आंधळा बसला होता. ते पाहून रमेश गोविंदाला म्हणाला, ''या बाजूला बसलेल्या त्या व्यक्तिला पाहिलस का ? तो आंधळा आहे पण गावातील विद्वान पंडित आहे.

रमेशचे म्हणणे गोविंदाला पटेना. शेवटी गोविंदा त्या आंधळ्याजवळ गेला. त्याला आपली ओळख सांगून गोविंदा त्याच्याशी गप्पा मारू लागला. गप्पा मारता मारता तो जन्मापासून आंधळा आहे हे गोविंदाच्या लक्षात आले. पण तो पंडित आहे यावर त्याचा विश्वास बसेना. म्हणून गोविंदाने त्याला विचारले, 'या देवळाच्या गाभाऱ्यात आपण रोज कुणाचं चिंतन करता? आपल्या अभ्यासाचा नक्की विषय कोणता आहे? यावर तो आंधळा म्हणाला, ''मी खगोलशास्त्राचा अभ्यासक आहे. हे त्याचे उत्तर गोविंदाला पटेना, ' 'तुम्हाला अजिबात दिसत नाही मग तुम्ही ग्रह ताऱ्यांचे निरीक्षण कसं करता? या त्याच्या संशयाने विचारलेल्या प्रश्नावर आंधळा स्वतःच्या छातीवर हात ठेवून म्हणाला, अरे, याच्या आतील सर्व ग्रह ताऱ्यांचे मी निरीक्षण आणि अभ्यास करत असतो. आता तरी कळलं का?

**तात्पर्य :** बाह्य ज्ञानापेक्षा अंतर्ज्ञान जाणून घेण्यातच विद्वत्ता आहे.

## जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



**- सोमावंती,** दिल्ली

मला सांगितले गेले आहे की मी महाराजजींबद्दल काही लिहावे, पण माझ्यात तीवा नाही की मी एवढ्या महान व्यक्तीबद्दल काही लिह शकेन.

यांच्या करूणेच्या काही आठवणी ज्या माझ्या जीवनाचा एक भाग आहेत, ज्या दयाल पुरूष संत दर्शनसिंहजी महाराजजींच्या दयेने माझ्या जीवनात घडल्या ज्यांनी माझ्या कठिण परिस्थितींना सुखात परिवर्तन केले, त्या दयेचे वर्णन त्यांच्याच दयेच्या कृपेने मी करीत आहे. माझ्या मुलीचे लग्न होते. मी महाराजजींना प्रार्थना केली की त्यांनी दर्शन द्यावे. तिथे लग्नाच्या दिवशी सकाळी माझ्या इथे वीज नव्हती. कसाबसा दिवस संपला. संध्याकाळी वऱ्हाडी येण्याची वेळ येऊन ठेपली होती पण विजेचा काही पत्ताच नव्हता. चारी बाजुंनी अंधकार होता, घरची माणसे चिंतातूर होती कारण बारात येण्याची वेळ जवळ आली होती पण काही व्यवस्था होत नव्हती. बारात पोहोचल्याचा आवाज ऐकू येऊ लागला. बॅन्डवाल्यांचा पण आवाज वाढला पण सगळीकडे घोर अंधार आणि सगळे चिंतेत होते. दया करणाऱ्या परमेश्वराला दया आली आणि आपल्या मुलांचे हाल बघायला ते आले. त्यांच्या तेजस्वी स्वरूपाचे आम्हाला दर्शन झाले आणि एकदम विजेचे आगमन झाले. चारी बाजुला प्रकाशमय वातावरण झाले. चेहऱ्यावर प्रसन्नता झळकली. पण आमच्या बुद्धीला काय म्हणावे, कोणता पडदा पडला होता माहित नाही. आम्ही व्यवस्थित रितीने प्रेमळ सद्गुरूंचे आदरातिथ्य पण करू शकलो नाही. सर्व लोक बारातीच्या स्वागत समारंभात मग्न होते. त्यांनी येऊन आमच्यावर दया केली. आमचे कार्य सांभाळले. बिघडललेले काम सुरळीत केले आणि आम्ही वेडे...... असो, ही तर त्यांच्या दयेची एक झलक होती. या जगात आलेल्या प्रत्येक जीवात्म्याला सुख-दुःखाच्या कसोटीवर पारखले जाते आणि आम्ही जीव जे खोटे नाण्यासारखे आहोत त्या कसोटीत नापास होतो. माझा मुलगा ऐन तारूण्यात २४ वर्षाच्या वयातच आम्हाला रडत ठेऊन या जगातून निघून गेला. आमची तक्रार परम पिता परमात्म्याने अस्विकार केली आणि नेहमीचा शोक आमच्या भाग्यात लिहिला. सच्चे बादशाहनी आम्हाला प्रेम आणि धैर्य दिले. पण संसारी जीवाला कुठून मिळणार आराम! माझ्या पतीने नाम घेतले नव्हते. यावरून मला त्यांनी खुप शेरे मारले. माझ्या गुरूंचा फोटो उलटा टांगला जेणेकरून कोणी दर्शन करू नये.

लंगरमध्ये सेवा करीत असताना एका महिलेचा पाय गरम तव्यावर पड इलाज करूनही तिचा आजार वाढत गेला. इतके झाले की जळल्यामुळे तिला संका

तला संक्रमण (सेप्टीक) झाले. तिला इस्पितळात भरती केले पण काहीच आराम आला नाही. महाराज ह्या गोष्टीची माहिती दिली गेली. महाराज दर्शनसिंहजी म्हणाले, हिचा प्रायव्हेट नर्सींग होममध्ये इलाज करा. सर्व खर्च आश्रम देईल.

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र (शांति)

उसमें भी देखने वालों को आपकी दिव्यता दिखायी पड़नी चाहिए। कहते थे, नारियल पानी को भी आप सड़क पर खड़े होकर मत पीओ। एक स्थान पर बैठकर योगयुक्त होकर पीओ। ईश्वरीय नियमों की पालना के लिए वे ब्राह्मणों का ध्यान खिंचवाते थे।

**उनकी हर बात प्रैक्टिकल होती थी**

वे सिर्फ ज्ञान सुनाते नहीं थे, वे खुद भी धारण करते थे। वही दूसरों से कहते थे। उनका जीवन प्रेरणा का स्रोत था। उनकी क्लासेस सुनने वालों के दिलों को छू लेती थी। एक बार कुमारी की भट्ठी थी मधुबन में, 'वे क्लास कराने आये थे। क्लास की शुरुआत में उन्होंने कहा कि अगर किसी का कोई प्रश्न हो तो लिखकर देना। चार-पाँच लोगों का एक ही। प्रश्न था और वह बहत अच्छा प्रश्न था। उस प्रश्न का उनका उत्तर भी। उतनी ही सचाई से भरा हुआ था। उसे सुनकर मेरे मन में जो प्रश्न थे। वो खत्म हो गये। प्रश्न था कि बाबा को तो सब पता रहता है वे सबका। सब-कुछ जानते हैं। एक तरफ कुछ आत्मायें ऐसी हैं जो क़ाबिल । नहीं हैं, फिर भी उनको अच्छा स्थान मिला हुआ है, उस पद के लिए बिलकुल लायक नहीं हैं। दूसरी तरफ़ कुछ आत्मायें ऐसी हैं जिन में योग्यतायें हैं, वे भटक रही हैं, उनको सही स्थान नहीं मिल रहा है। लोग ऐसे भी हैं, जो यज्ञ के हितैषी नहीं हैं लेकिन उनको यज्ञ में सा संरक्षण मिला हुआ है। कुछ लोग सच में यज्ञ-रक्षक हैं लेकिन उन को विश्वास नहीं रखा जा रहा है या उनको साधारण स्थान या सेवा दी गयी है। सार यह था कि अच्छे लोगों के साथ बुरा क्यों होता है और बुरे लोगों के साथ अच्छा क्यों होता है ? भगवान जानी-जाननहार है। ऐसा क्यों ?

यह उन कुमारों का प्रश्न था। यह प्रश्न पढ़कर भाई साहब मुस्कराये और हम सबसे पूछा कि 'अच्छा और बुरा' की परिभाषा आप किस रूप से दे रहे हैं? किसी ने उत्तर नहीं दिया। फिर उन्होंने पूछा कि रामायण में मंथरा एक कैरेक्टर है, आप जानते हो? सबने कहा, जी हाँ। उन्होंने पूछा, उसका कैरेक्टर कैसा था ? सबने कहा, नेगेटिव फिर उन्होंने पूछा, क्यों नेगेटिव था ? सबने कहा, उसने कैकेयी के कान भरे, राम को वनवास भेजा। उसके कारण राजा दशरथ ने प्राणत्याग किये। भाई साहब ने कहा, ठीक है, यह एक पहलू है। अभी दूसरे पहलू से सोचो। अगर राम वनवास नहीं जाता तो असुरों का वध कैसे होता ?

अहिल्या, जटायु, रावण और ऋषि-मुनियों का उद्धार कैसे होता ? दुष्टों का संहार, शिष्टों का उद्धार जो हुआ, किस के कारण ? सब भाई चुप हो गये। उन्होंने पूछा, असरों का संहार और ऋषि-मुनियों के उद्धार के लिए कारण कौन बना? उत्तर मिला, मंथरा। अब बताओ, मंथरा

नेगेटिव रोल है या पोज़िटिव ? सबने बोला, पोजिटिव। भाई साहब ने 'कहा, ड्रामा में कुछ ऐसी चीजें हैं, आपको अभी समझ में नहीं आती। ड्रामा एक बहुत लम्बी चीज़ है, हमारी दृष्टि बहत हद की है। आप तो डबल और बेहद के सेवाधारी हो । आप दिल्ली में सेवा करते हो और मधुबन में भी ।

वीआईपी की सेवा कैसे करनी होती है - उन्होंने यह भी सिखाया जी के बहत-से वीआईपीज़ हमारे सम्पर्क में होने के कारण वे रहते थे, आज इनकी सेवा करनी है, आज इनकी सेवा करनी है।

नर्सिटी के प्रोफेसर्स, वाइस चान्सलर्स, डीन आदि कुछ मेरे सम्पर्क में कछ मेरे क्लासमेट्स (सहपाठी) भी थे और कुछ मेरे मरीज़ थे। भाई माहब ने अपनी देखरेख में हमारे से उन सबकी सेवा करवायी। उनका ज्ञान सनाने का तरीक़ा बड़े गज़ब का था। वे जब वीआईपी को ज्ञान सुनाते थे, हमें भी बहुत कुछ सीखने को मिलता था। भाई साहब की लक्ष्य जनित सेवा होती थी। किस आत्मा को क्या देना है, कितना देना है, कैसे देना है- उनकी यह योजना पहले ही तैयार रहती थी, उसके अनुसार ही वे सेवा करते थे। कोई भी व्यर्थ और अनावश्यक बातें उनको नहीं सुनाते थे। जो भी आते थे उनको सेन्टर से चाय-नाश्ता खिलाये बगैर नहीं भेजते थे।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

### शीतपेये

तसेच बेन्झोइक ॲसिड किंवा बेन्झोइट्स ही द्रव्ये परिरक्षक (प्रिझर्वेटिव्ह) स्वरूपात असतात. काही संवेदनशील लोकांना या परिरक्षकांचा त्रास होऊन उलटी. मळमळ, तीव्र डोकेदुखी, रक्तदाब वाढणे, त्वचेवर खाज येऊन फोड येणे अशा प्रकारचा त्रास होऊ शकतो.

अनेकांचा गैरसमज असतो, की या शीतपेयां मध्ये नैसर्गिक फळांचा रस व रंग असतो; परंतु नैसर्गिक फळांचा वापर अगदी कमी प्रमाणात म्हणजे १०% फळांचा रस वापरतात. उरलेले ९०% हे कृत्रिम साखर, कृत्रिम रंग, स्वाद यांचा वापर करण्यात येतो. शीतपेयांमध्ये जास्त प्रमाणात साखर आणि ॲसिडचा वापर करण्यात येतो. त्यामुळे अति प्रमाणात वजन वाढणे स्थौल्य विकार जडतो. सध्या लहान मुलांमध्येही या शीतपेयांमुळे स्थौल्य विकार दिसून येतो या पेयांमुळे भूक भागली जाऊन आहारातील पोषक घटक घेतले जात नाहीत. एकीकडे सीराचे वजन वाढते; परंतु हे वजन फक्त विकृत चरबीचेच असल्यामुळे इतर धातूंचे पोषण होत नाही व पर्यायाने कुपोषण होते.

शीतपेयांमध्ये असणाऱ्या साखर व कॅफिनमुळे शरीरातील पॅनक्रियाज हा अवयव उत्तेजित होऊन इन्शुलिनची निर्मिती करतो. हे वाढलेले इन्शुलिन शरीरामध्ये चरबी साठविण्याची आज्ञा देते. शरीरात इन्शुलिनची मात्रा वाढल्यामुळे पुन्हा पुन्हा भूक लागल्याची भावना निर्माण होते व अशा पद्धतीने चुकीच्या आहारामुळे स्थूलता वाढते. म्हणून पाश्चात्त्य संस्कृतीचे अनुकरण थांबवून वेळीच शीतपेयांचा वापर आपल्या जीवनशैलीत अगदी प्रमाणात गरजेपुरताच करावा.

पर्यायी पेये : नैसर्गिक फळांपासून बनविलेली पेये, सरबते यांचा वापर तहान भागविण्यासाठी व शरीराला ऊर्जा मिळविण्यासाठी करावा.

उदा. संत्री, मोसंबी, ज्यूस, कोकम सरबत, आवळा, लिंबू सरबत इत्यादी.

दूध, दही, ताक, लोणी, साजूक तूप, मध या सर्व द्रव्यांमुळे मनुष्याचा सर्वांगीण विकास होतो. ही सर्व द्रव्ये शरीरावर अमृताप्रमाणे कार्य करुन मनुष्याचा शारीरिक व मानसिक विकास करतात. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवून अनेक रोगांपासून मुक्त करतात. आयुर्वेदामध्ये पंचामृत रोज सकाळी घेण्यास सांगितले आहे. पंचामृत नियमित घेतल्याने आरोग्य चांगले राखले जाते.

**- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वेदांमधील ज्ञान सर्व मानवजातीसाठी कल्याणकारी

## खा.डॉ.सत्यपाल सिंह



माजी केंद्रीय मंत्री, मुंबईचे माजी पोलिस आयुक्त तथा खा. डॉ. सत्यपाल सिंह यांनी नगर तालुक्यातील कामरगावस्थित प्रज्ञाचक्षू विरजानंद दंडी कन्या गुकुलला भेट दिली. त्यावेळी त्यांचे स्वागत करताना आचार्या विश्रुतिजी आर्या आदी.

### कामरगाव येथील विरजानंद दंडी कन्या गुरुकुलला सदिच्छा भेट

नगर – माजी केंद्रीय मंत्री, मुंबईचे माजी पोलिस आयुक्त तथा विद्यमान खा.डॉ.सत्यपाल सिंह यांनी नगर तालुक्यातील कामरगाव स्थित प्रज्ञाचक्षु विरजानंद दंडी कन्या गुरुकुलला भेट देवून येथील उपक्रमांची पाहणी केली. गुरुकुलच्यावतीने आचार्या विश्रुतिजी आर्या यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले. खा.सत्यपाल सिंह यांनी गुरुकुलमधील विद्यार्थ्यांशी मराठी तसेच हिंदीतून मनमोकळा संवाद साधला.

खा.सत्यपाल सिंह म्हणाले, भारतीय संस्कृतीत गुरुकुल परंपरेला मोठे महत्व आहे. कामरगावसारख्या अतिशय छोट्या गावात आचार्याजी, गुरुकुल कमिटीमधील सर्व बडगिरेजी, पदाधिकारी कन्या गुरुकुल चालवत आहेत हे खूप कौतुकास्पद आहे. आताच्या काळात आरोग्य खूप महत्वाचे आहे. आजार स्वत:हून येत नाही आपण त्याला आमंत्रण देत असतो.

जे रात्री लवकर झोपतात व सकाळी लवकर उठतात ते नेहमी निरोगी, ऐश्वर्यवान, उत्साही, चारित्र्यवान, बुध्दीमान, विव्दान व गुणवान बनतात. अशाच विद्यार्थ्यांमुळे चांगल्या राष्ट्राची निर्मिती होते. वेद हा माझा वैयक्तिक आवडता विषय आहे. त्याचा सखोल अभ्यास केला आहे.

वेदाला श्रृती म्हणतात. वेदांमध्ये विज्ञान आहे. वेद स्त्री व पुरुष दोघांसाठीही खुले आहे. वेदांमधील ज्ञान सर्व मानवजातीसाठी कल्याणकारी आहे. मी आयपीएस पीरक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झालो. यशासाठी ध्येय निश्चित पाहिजे व त्यासाठी अविरत परिश्रम घेतले पाहिजे असा मंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. ऋतुज्ञा यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रमिति, वेदश्री, भक्ती, कार्तिकी, तनिष्का, ईश्वरी यांनी परिश्रम घेतले.

# गणेश चतुर्थीला ७ सप्टेंबरला नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात 'सामूहिक तारक मंत्र जप'



नगर – नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात शनिवारी भक्तीभावाने हनुमान चालीसा पठण होत आहे आणि हनुमान चालीसा पठणासाठी भाविक उपस्थित राहतात. श्रीराम जयराम जय जय राम ह्या तारक मंत्राचा संगीतमय अखंड सामुदायिक जप ७ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थीला श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट श्रीराम मंदिर, नवीपेठ येथे रात्री ८ ते रात्री ११ या वेळेत होणार आहे.

तसेच श्री हनुमान चालीसा पाठ करण्यात येणार आहे. नामस्मरण स्वरूपी अनुष्ठानात भाग घेऊन सर्व शहरवासीयांनी प्रभू श्रीराम चरणी आपली सेवा अर्पित करावी, असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ, ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांच्या वतीने करण्यात आले.

गेल्या १७ वर्षापासून श्रीराम मंदिर ट्रस्टच्यावतीने मंदिरात दर शनिवारी हनुमान चालीसा पठण कार्यक्रम भक्तीभावाने होत आहे. गेल्या १७ वर्षापासून श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळाच्यावतीने श्रीराम नवमी व हनुमान जयंती गोकुळ अष्टमी देवदिवाळी अन्न कुट तसेच धार्मिक उत्सव ट्रस्टच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतात.

तसेच संपूर्ण मंदिराची देखभाल ट्रस्टच्यावतीने करण्यात येते. मंदिराचे नूतन प्रवेशव्दार हे आयोध्या येथील श्रीरामलल्ला नूतन प्रतिमा प्रमाणे भगवान श्री विष्णु दशअवतार, डाव्या बाजूस श्री हनुमानजी, उजव्या बाजूस गरुड भगवान अशा स्वरुपात सुंदर आकर्षक प्रवेशव्दार नव्याने साकारण्यात आले आहे. हेच मंदिराचे मुख्य आकर्षण ठरत आहे.

श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट वतीने मंदिर नुतनीकरण व नविन आकर्षक प्रवेशद्वार करण्यात आले आहे.



अहमदनगर जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व महानगरपालिका यांचे वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बेसबॉल स्पर्धेत येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला सावेडी विभागातील १७ वर्ष मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. (छाया – उदय जोशी)

# बेसबॉल स्पर्धेत सावेडी समर्थ विजयी

नगर – अहमदनगर जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व महानगरपालिका– यांचे वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बेसबॉल स्पर्धेत येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला सावेडी विभागातील १७ वर्ष मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला वरील संघानी पुणे विभागीय पातळीवर निवड झाली आहे.

खेळाडू पुढील प्रमाणे आदीत्य सोळसकर (कॅप्टन), ईशान कराळे (उपकॅप्टन), नील शिरसाठ, प्रणव पाटसकर, सुयश काथवटे, श्रवण कुलकर्णी, अनिकेत जाधव, सार्थक शिंदे, वेदांत मते, अथर्व लडकत, वेदांत लटके, नितिन लांडगे, आदेश ताठे, श्रेयश जायभाय, ओंकार उरणकर, प्रथमेश उरूणकर आदी सर्व यशस्वी खेळाडूंना प्रशालेचे क्रीडाविभाग प्रमुख पोपट लोंढे यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले.

वरील उज्वल यश संपादन करणाऱ्या सर्व खेळाडूंना संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती संगिता जोशी, पर्यवेक्षिका सौ. वसुधा जोशी, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# जटिल प्रश्न व शंकांचे निरसन 'समाधी साधन' या ग्रंथातून होते

## योगगुरु दत्ता दिकोंडा यांचे प्रतिपादन; माजी प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे लिखित 'समाधी साधन' ग्रंथाचे प्रकाशन



माजी प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे लिखित 'समाधी साधन' या ग्रंथाचे प्रकाशन करताना योगगुरु दत्ता दिकोंडा. समवेत डॉ. दिलीप धनेश्वर, भागवताचार्य अशोकानंद कर्डिले महाराज आदी.

नगर – डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी लिहिलेल्या 'समाधी साधन' ग्रंथात सिद्ध सिद्धांत पद्धती, कुंडलिनी शक्तीचे जागरण, श्री ज्ञानेश्वरीमधील आत्मसंयम योग, अनुभवामृत, योगसंग्राममधील समाधी साधना, संत एकनाथ चर्चित सिद्ध विचार, संत तुकारामांचे सदेहवैकुंठगमन, कर्मयोगाचा वस्तुपाठ संत सावतामाळी, स्वामी विज्ञानानंदांची प्रकाश समाधी. डॉ. सहस्रबुद्धे यांनी या ग्रंथातून योग मार्गातील अनेक जटील व क्लिष्ट प्रश्नांना योगशास्त्रीय उत्तर देऊन शंकांचे निरसन केले आहे, असे प्रतिपादन योगगुरु दत्ता दिकोंडा यांनी केले.

प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे लिखित 'समाधी साधन' या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. दिलीप धनेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात दत्ता दिकोंडा यांच्या हस्ते आणि भागवताचार्य अशोकानंद कर्डिले महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच झाले. यावेळी साहित्यिक, आध्यात्मिक तसेच विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

भागवताचार्य अशोकानंद कर्डिले महाराज म्हणाले, योगमार्ग, समाधी साधना, संजीवन समाधी, रिद्धी सिद्धी या विषयी जनमानसात गुढ जटील असे प्रश्न घोळत असतात. अंधश्रद्धेच्या नावाखाली अनेक क्लिष्ट प्रश्न उपस्थित केले जातात. अनेकदा हे प्रश्न पूर्वग्रह दूषित आणि हेतू पूर्वक निर्माण करून संभ्रम निर्माण केले जातात. अशा परिस्थितीत डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचा समाधी साधना हा ग्रंथ अध्ययनाच्या वाटेवर मार्गदर्शक ठरेल.

डॉ. दिलीप धनेश्वर म्हणाले, गेल्या वर्षभरापासून श्री ज्ञानेश्वरीचा अभ्यास वर्ग प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद विद्यालयात सुरू आहे. सर्व क्षेत्रातील अभ्यासक या वर्गात सहभागी होत श्री ज्ञानेश्वरीचे सामूहिक चिंतन व अभ्यास करत आहेत. गुरुवर्य अनिल सहस्रबुद्धे यांचा समाधी साधन हा ग्रंथ ब्रह्मविद्यायम योगशास्त्रे अशा श्रीमद्भगवद्गीतेतील चिंतनाप्रमाणे शंकानिरसन करीत मार्गदर्शन करणारा आहे.

ग्रंथाचे लेखक डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी यावेळी आपल्या मनोगतातून ग्रंथामागची संकल्पना विषद केली. समाधी साधना हा ग्रंथ वीहा पब्लिकेशनचे पहिलेच प्रकाशन असून यानिमित्त संधी दिल्याबद्दल पुस्तकाचे प्रकाशक श्रीपाद कुलकर्णी यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी प्रा.ऋता ठाकूर यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. उषा सहस्रबुद्धे यांनी प्रास्ताविक केले, उल्हास घोडके यांनी ओमकार साधना सादर केली. प्रा. राजू रिक्कल यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मच्छिंद्र मालुंजकर यांनी आभार मानले.

# सारडा महाविद्यालयाचा द्वितीय आदर्श प्राचार्य पुरस्कार डॉ.भरत शिंदे यांना जाहीर



नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांसाठी गतवर्षीपासून सुरू करण्यात आलेल्या 'स्व. प्राचार्य एस.एम.कुलकर्णी' आदर्श प्राचार्य पुरस्कारासाठी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या आर्टस् कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भरत शिंदे यांची निवड घोषित करण्यात आली आहे.

पुरस्काराचे हे द्वितीय वर्ष आहे. ६ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ.पराग काळकर यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. २५००० रुपये रोख, सन्मान चिन्ह, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक असणार असून संस्थेचे ज्येष्ठ सभासद शरदतात्या लोंढे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच संस्थेचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी आदींच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

सन १९६२ ते १९७४ या काळातील सारडा महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य स्व. एस.एम. कुलकर्णी हे द्रष्टा शिक्षणतज्ज्ञ म्हणून सुपरिचित होते. त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त आदर्श प्राचार्य पुरस्काराचा उपक्रम सारडा महाविद्यालयाने गतवर्षीपासून सुरू केला आहे. या पुरस्काराने पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्राचार्यांना उच्च शिक्षणात समाजाभिमुख आणि तृणमूल कार्यासाठी प्रोत्साहन मिळावे हा या पुरस्कारामागील उद्देश आहे, अशी माहिती महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. मंगला भोसले यांनी दिली.

आदर्श प्राचार्य पुरस्काराच्या निवड समितीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. संदीप पालवे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य अमोल घोलप, नगरच्या न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. भास्कर झावरे, तसेच हिंद सेवा मंडळाचे दोन पदाधिकारी आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी आलेल्या प्रस्तावांचे तपशीलवार आणि तुलनात्मक अध्ययन केले. त्यातून आदर्श प्राचार्य पुरस्कार्थीची निवड करण्यात आली आहे.

विविध १७ मुद्यांप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिवांचा आणि नागरिकत्वाचा विकास, शिक्षणातील आणि संशोधनातील असामान्य गुणवत्ता तसेच आजी–माजी विद्यार्थी आणि सहकारी प्राध्यापक यांचा अनुभव हे निकष पुरस्कार निवडीसाठी विचारात घेण्यात आले.

या पुरस्कारासाठी एकूण १५ अर्ज प्राप्त झाले होते. प्राचार्य पदाचा कालावधी, महाविद्यालयाचा शैक्षणिक व इतर विकास, विद्यार्थी उपयोगी उपक्रम, नवीन अभ्यासक्रम, पुरस्कार, अनुदान, प्राचार्यांची विद्यार्थ्यांप्रती असणारी बांधिलकी, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्याकडून घेतलेला अभिप्राय या सर्व बाबींचा विचार करण्यात आला होता, अशी माहिती महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद देशपांडे यांनी दिली

पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रबंधक अशोक असेरी, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. राजेंद्र कुंभार तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी प्रयत्नशील आहेत.



शहरातील तारकपूर बसस्टॅण्ड येथे बरेली शरीफ येथील आला हजरत हजरत यांच्या उर्स शरीफ निमित्त आयोजित मोफत रक्तातील साखर तपासणी शिबीर प्रसंगी मतीन पठाण आदी.

# 'इन्सानियत' व 'अझलाने' फाउंडेशनतर्फे मोफत साखर तपासणी शिबिरास प्रतिसाद

नगर – शहरातील तारकपूर बस स्टॅन्ड येथे सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत बरेली शरीफ येथील आला हजरत यांच्या १०६ व्या उर्स शरीफ निमित्त मुकुंदनगर परिसरातील इन्सानियत फाउंडेशन व अझलाने रजा वेल्फेअर फाउंडेशनतर्फे मोफत रक्तातील साखर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी अध्यक्ष मतीन पठाण, उपाध्यक्ष जमीर शेख, खजिनदार फरदीन खान व सदस्य शाहरुख खान, तौफिक शेख, अफरोज शेख, वसीम तांबोळी, दबीर शेख व मेडिकल प्रतिनिधी अविनाश गिरी व फिरोज सय्यद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिरात एकूण ७० ते ८० प्रवासी व परिवहन कर्मचारी यांची तपासणी करण्यात आली. व मोफत औषध उपचार करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आगार प्रमुख अभिजीत चौधरी व त्यांचे कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे निर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष महेंद्र गंधे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सहपरिवार भेट घेतली. यावेळी मीनल गंधे, मल्हार गंधे व ॲड. ऋग्वेद गंधे आदी.

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी महेंद्र गंधे यांची निवड

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून कौतुकाची थाप

नगर – नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी भारतीय जनता पार्टीचे नगर शहर विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे हे बिनविरोध निवडून आले आहेत. या पार्श्वभूमीवर श्री. गंधे यांनी मुंबई येथे सागर बंगल्यावर सहपरिवार भेट घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल महेंद्र गंधे यांचे अभिनंदन करून कौतुकाची थाप दिली. यावेळी सौ.मीनल गंधे, मल्हार गंधे व ॲड. ऋग्वेद गंधे उपस्थित होते.

महेंद गंधे यांची ब्राह्मण समाजच्या राष्ट्रीय संघटनच्या अध्यक्षपदी निवड होणे हे अभिमानास्पद आहे. त्यांनी कलेल्या राजकीय व सामाजिक कार्याची ही पावती आहे. या पदाच्या माध्यमातून समाजातील गरजू व शेवटच्या घटकाचे पश्न समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावे, अशी सूचना करून सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

यावेळी महेंद गंधे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानून शतक पार केलेल्या संस्थेच्या अध्यक्षपदी काम करण्याची मिळालेल्या संधीचे सोन करून या संस्थेस अधिक उभारणी देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली देशभर काम करू असे सांगून विविध विषयांवर फडणवीसांशी चर्चा केली.

# श्रीलता आडेप यांनी स्विकारली इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदाची सूत्रे

## पदग्रहण सोहळ्यात सामाजिक कार्याचा जागर



इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगर व्हिनसच्या पदग्रहण सोहळ्यात पुन्हा अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताना श्रीलता आडेप. समवेत इतर पदाधिकारी.

नगर – इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगर व्हिनसच्या पदग्रहण सोहळा सामाजिक कार्याचा जागर करुन पार पडला. यावेळी माजी अध्यक्षा श्रीलता आडेप यांच्याकडे पुन्हा अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. तर खजिनदार शुभांगी देशमुख, आयएसओ जयश्री गायकवाड, संपादक कोमल वधवा यांनी देखील पदाची सूत्रे स्विकारली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सायली खान्देशी, डॉ. सोनाली वहाडणे, सारिका मुथा, अर्पिता शिंगवी, कल्पना गांधी, स्वाती गांधी, मौसमी गुरवे आदी उपस्थित होते.

प्रारंभी इनरव्हीलची प्रार्थना घेऊन दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. श्रीलता आडेप यांनी मागील वर्षी राबविण्यात आलेले कॅन्सर जनजागृती उपक्रम, गरजू विद्यार्थी व शाळांना शैक्षणिक मदत, आरोग्य तपासणी शिबिरांसह सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या उपक्रमाच्या आढावा घेतला.

सायली खान्देशी यांनी श्रीलता आडेप यांनी उत्तमप्रकारे केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पुन्हा एक वर्षासाठी अध्यक्षपदाची सोपविण्यात आलेली जबाबदारी अभिनंदनास्पद असल्याचे सांगितले. मागील वर्षी १०३ सामाजिक उपक्रम राबवून विविध अवॉर्ड मिळवल्याबद्दल आडेप यांचा यावेळी सत्कार देखील करण्यात आला.

श्रीलता आडेप म्हणाल्या की, समाजाची गरज ओळखून इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगर व्हिनस योगदान देत आहे. विविध क्षेत्रातील महिलांना एकत्रित करून ही सामाजिक चळवळ सुरू आहे. सामाजिक कार्यात महिला योगदान देवून शेवटच्या घटकांपर्यंत मदत पोहचविण्याचे कार्य करत असल्याचे सांगितले. क्लबच्या इतर पदाधिकाऱ्यांना विविध पदाची सूत्रे देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या पदग्रहण सोहळ्यासाठी क्लबचे महिला सदस्या उपस्थित होत्या.

# मराठा सेवा संघाच्या नवीन इमारत बांधकामाचे प्रदेशाध्यक्षांकडून पाहणी

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा सेवा संघाच्या टिळक रोड येथील नवीन इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष इंजिनिअर डॉ. विजयराव घोगरे पाटील यांनी रविवारी पाहून आढावा घेतला. यावेळी कामकाजाच्या संदर्भात जिल्हाध्यक्ष इंजिनिअर सुरेशराव इथापे यांनी सविस्तर माहिती दिली. हे काम समाधानकारक असून मराठा सेवा संघाच्या प्रत्येक पदाधिकारी व मराठा समाजातील सर्व समाज बांधवांनी या इमारतीच्या बांधकामासाठी आर्थिक हातभार लावावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

मराठा सेवा संघाची नवीन इमारत हे ज्ञानाचे व विचारांचे मंदिर व्हावे अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. या ठिकाणी मराठा सेवा संघाचे कार्यालय तसेच अभ्यासिका ग्रंथालय अशा विविध योजना राबवण्याचा आमचा मानस असल्याचे जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष संपूर्णाताई सावंत यांनी सांगितले.

यावेळी माजी महापौर शीलाताई शिंदे, इंजी. राजेंद्र निमसे, मराठा पतसंस्थेचे संचालक बाळासाहेब काळे, सतीश इंगळे, उदय अनभूले, माणिक आल्हाट, पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड उपस्थित होते.



मराठा सेवा संघाच्या नावाने इमारत बांधकामाची पाहणी करताना प्रदेशाध्यक्ष इंजि. डॉ. विजयराव घोगरे पाटील. समवेत इतर व्यक्ती.

# आजच्या सामाजिक पार्श्वभूमीवर पालकत्व (मुलगा असो वा मुलगी)

हम्म खरंय...समाज धुमसतोय! जबाबदारी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. काळानुरूप नाते संबंध ढवळून निघाले आहेत. नात्यांची आणि ते निभावण्याची परिभाषाच बदलली आहे आणि अजून ही ती बदलत जाणार आहे. आज पालकत्वही बदलत चाललंय.

पुर्वी मुलगा व मुलगी असा भेदभाव केला जायचा. त्याला तशी तत्कालीन कारणे देखील होती. पुढे शैक्षणिक क्रांती झाली. शिक्षणाने सुजाण नागरिक उदयास आले. मुलगा, मुलगी दोहोंतील भेदभाव हळूहळू नाहीसा होत गेला. हल्ली व्यक्तीसापेक्ष भेद बाजूला राहिला आणि ज्या समाजात पाल्याने ताठ मानेने वावरले पाहिजे तो समाजच बदलला आहे. प्रामाणिकपणे सचोटीने वावरताना आजूबाजूच्या गढूळ परिस्थितीमुळे बऱ्याचदा पालकत्व बजावताना एक अनामिक दडपण यायला लागले आहे मनावर!

सांगायचे एक, शिकवायचे दुसरे, वागवायचे तिसरेच!

९०च्या दशकात गोष्टी खरंच खुप सोप्या होत्या. मोकळे पणाने मुलांशी गप्पा व्हायच्या. मुलेही मोकळेपणाने पालकांशी बोलायची. त्यांना हवे नको, त्यांना काय वाटते हे सगळे एका मर्यादेपर्यंत पालकांशी बोलले जायचे. आता तंत्रज्ञान एवढे विकसित झाले आहे की जरा कुठे अडलं की घे गुगलबाईंची मदत ! एका दृष्टीने अतिशय उपयुक्त असे हे तंत्रज्ञान; प्रसंगी घातकही ठरू लागले आहे. उमलत्या वयात भेडसावणारे प्रश्न, जिज्ञासू वृत्ती असल्यामुळे मनात येणारे विचार, दैनंदिन जीवनातील अडथळे या आणि अशा प्रकारच्या अनेक बाबींसाठी मुले ...मग ती मुलगी असो वा मुलगा इंटरनेट, सेल फोन्स चा सर्रास वापर करताना दिसतात. पालकांना माहीत नसलेले विषयही या मुलांना इत्यंभूत ज्ञात असतात.

तंत्रज्ञानाचा कितपत वापर करावा, त्यातून काय घ्यावे काय नाही अशी साधक बाधक बुद्धी मुलांकडे नसते! अगदी बरोब्बर इथेच पालकांचा कस लागतो. आपण कितीही काळजीने काही सांगत असलो तरी ते ठराविक पातळीनंतर अथवा वेळेनंतर मुलांना ते नकोसे होते. अशा वेळी त्यांच्याशी त्यांच्यातीलच एक होऊन गप्पा मारल्या तर ते त्यांना चटकन भावते. एकदा का त्यांना आपण त्यांचे मित्र वाटायला लागलो की निम्मे यश आलेच म्हणून समजा! हळूहळू त्यांच्या पोटात शिरून त्यांचे भावविश्व समजून घेता येते. मुलांचे भावविश्व समजून घेताना अशा आशयाच्या अनेक कार्यशाळा आयोजित होत असतात ते जरूर अनुभवावे.

मला सांगा; जर आपल्याला सतत कोणीतरी सूचना करतंय, काहीतरी शिकवतंय, आपल्या चुका काढतंय इ. इ. कसे वाटेल....नाही आवडणार ना!!! मुलांनाही नसते आवडत. त्यांची मते, विचार त्यांना व्यक्त करू द्यावेत. म्हणजे मग जिथे विचारांची दिशा चुकतेय असे वाटत आहे तिथेच हलकीशी कळत नकळत टिचकी मारावी, काही झाले नाही अशा आविर्भावात गोष्टी पुढे न्याव्यात. त्यामूळे होते असे की, आपल्याला ही काहीतरी येते आहे, आपणही योग्य विचार करु शकतो हा आत्मविश्वास मुलांच्या मनात आपसूक रुजू लागतो. सद्यस्थितीत स्पर्धा अजब झाली आहे. स्वतः चे अस्तित्व, वेगळेपण टिकवण्यासाठी जादाची मेहनत घ्यावी लागते आहे मुलांना हे आपण ही जाणून घ्यावे. त्यांच्या वयानुरूप अतिउत्साहाला वैचारिक खाद्य देत रहावे. उदाहरणांसकट चांगल्या वाईटाची ओळख करून द्यावी. सिद्ध करून दाखवले की ईप्सित परिणाम साधता येतो.

वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळी आव्हाने पालकांना पेलावी लागतात. कितीही आणि काहीही म्हणले तरी काही वेगवेगळी आव्हाने मुले आणि मुलींना पेलावी लागतात. हे अगदीच नैसर्गिक आहे. संस्कारक्षम वयातच उमलत असताना मुलांना मुलींविषयी आणि मुलींना मुलांविषयी आदरभाव, माणुसकी शिकवली गेली पाहिजे. समाजात वावरताना प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेताना आपले संस्कार न विसरता योग्य ती पावले कशी घ्यावीत हे आपल्या आचरणातून दाखवून द्यावे. मुले म्हणजे टिपकागद असतात. जणु आपण एक आरसा आहोत हे सातत्याने मनात ठेवले की आपसूक चांगल्या गोष्टी घडत जातात आणि मग चांगल्याच गोष्टी मुले आत्मसात करत जातात.

मोठी माणसेच मोबाइलचा अति वापर करताना दिसतात. फावल्या वेळात पुस्तके वाचली, काही छंद जोपासले, जमेल तशी सामाजिक कार्ये केली, घरात गप्पा मारताना समाजाप्रती आदर व्यक्त केला, आपण समाजाचे काहीतरी देणं लागतो अशी भावना कृतीतून व बोलण्यातून व्यक्त केलीत की न बोलताही संस्कारांचा, पालकत्वाचा बराचसा पल्ला सहज गाठता येतो. वेळोवेळी समाजात घडत असलेल्या चांगल्या व वाईट दोन्ही गोष्टींची चर्चा घरात घडवून आणली तर मुलांना समाजाचे भान येते, मुले त्यावर कशी प्रतिक्रिया देतात, त्यावर काय भाष्य करतात यातून त्यांच्या विचारांची दिशा आपल्याला कळते. इथे पालक म्हणुन आपण मुलांना योग्य मार्गदर्शन करु शकतो.

आपण केवळ मुलगा आहोत किंवा केवळ मुलगी आहोत याचा सोयीस्कररित्या फायदा उठवू नये आणि त्याचे अनावश्यक दडपणही घेऊ नये हे कुठेतरी बिंबवले पाहिजे मुलांच्या मनावर. एक सुजाण पालक म्हणुन आपल्या पाल्यास जीवनाकडे सजगतेने पहावयास शिकवावे. आजूबाजूची प्रत्येक घटना काही प्रमाणात स्वीकारण्याची, त्यांवर व्यक्त होण्याची, प्रसंगी मानसिक उद्विग्नतेस भावनिक वाट करून देण्याची सवय मुलांना लहानपणापासूनच लागली की मोठेपणी स्वतःच्या शारीरिक व मानसिक बदलांमुळे मुले बिथरून जात नाहीत. सामाजिक पार्श्वभूमी नेहेमी सकारात्मकच असेल असे नाही. तेव्हा जीवनात येणाऱ्या नकारात्मक प्रसंगांना अथवा घडामोडींनाही कसे हाताळावे, जीवनातील आव्हाने कशी पेलावी याची जाण देण्याची गरज फक्त असते. पालकत्व केवळ एक जबाबदारी आहे असे दडपण न घेता; त्याची फक्त जाणीव असावी. आपण एक सुजाण नागरिक घडवत आहोत, ही एक सुंदर निर्मिती प्रक्रिया आहे असे एकदा मनात आले की बाकी वरच्या बाबी हमखास सुयोग्यच घडणार याची खात्री बाळगा !

– **स्वरूपा कुलकर्णी**, पुणे



नालेगाव परिसरातील विजेचा प्रश्न माजी नगरसेविका सौ. सोनाली चितळे यांच्या प्रयत्नाने नवीन डी. पी. मुळे सुटला. डी.पी. समवेत अजय चितळे आदी. (छाया – लहू दळवी)

# नालेगाव परिसरातील विजेचा प्रश्न सुटला

## नगरसेविका सोनाली चितळे यांच्या प्रयत्नाने २०० के.व्ही. डी.पी.चे काम पूर्ण

नगर – नालेगाव परिसरातील कवडे गल्ली, लांडे गल्ली, वाघ गल्ली, रोहकले गल्ली, मानकर गल्ली, हडको या परिसरातील लाईट अनेक वेळा खंडित होत होती. विजेची मागणी वाढल्यामुळे जुन्या २०० केव्हीच्या डीपीवर लोड येत होता, त्यामुळे सकाळी पाणी सुटल्या वर नागरिकांच्या पाण्याच्या मोटरी चालू झाल्या की या भागातील लाईट वारंवार खंडित होत होती.

दिल्लीगेट विभागातील जुनियर इंजिनिअर व एमईसीबीचे कर्मचारी यांच्या बरोबर सतत खंडित होत असलेल्या वीज पुरवठ्या बाबत चर्चा केल्यानंतर, विजेची मागणी वाढल्यामुळे डीपी वर लोड येत असल्याबाबत त्यांनी माजी नगरसेविका चितळे यांना कळविले होते. तत्कालीन खा.सुजय विखे पाटील व आ.संग्राम जगताप यांच्याकडे नगरसेविका सोनाली चितळे यांनी मागणी करून व पाठपुरावा करून २०० के व्ही ची डी पी मंजूर करून घेतली होती.

ही नवीन डीपी उभारण्यासाठी जागेची अडचण होत होती. आपल्या जागे समोर डीपी उभारण्यास परिसरातील काहींचा विरोध होता. मात्र विकास वाघ व अजय चितळे यांनी हा प्रश्न सोडविला. नवीन डीपीचे काम पूर्ण झाल्याने परिसरातील विजेचा मोठा प्रश्न सुटल्याचे अजय चितळे यांनी सांगितले.


बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

**NOTICE TO BORROWER**

(UNDER SUB-SECTION (2) OF SECTION 13 OF THE SARFAESI ACT, 2002)

**To,**
**1. Mr.SHAKIL AHMADHUSEN CHAUGULE**
**2. MRS. MUNNI CHAUGULE W/O SHAKIL CHAUGULE**
S.NO.50/1, GANGARDE NAGAR ROAD,
LANE NO.1, PIMPLEGURAV, TAL:HAVELI PUNE-411061

**Dear Sir,**
**Re: Credit facilities with our Branch.**

1. We refer to our sanction letter Dated 24.05.2023 conveying sanction of Term Loan facilities i.e. Housing Loan facility under home loan scheme. Pursuant to the above sanction, you have availed housing loan facility after providing security for the same, as hereinafter stated. The present outstanding in loan facilities and the security interests created for such liability are as under:

| Nature & Type of Fafility | Limit (Rs.) | Rate of Interest (%) | O/s. as on 14.08.2024 (amt in Rs.) | Security Agreement with brief description of securities |
|---|---|---|---|---|
| Housing Loan (79270600002824) | 20.00 lacs | 9.80%(as per sanction) | 19,69,430.00 + other charges if any as on date | 1.Equitable Mortgage of All that part and parcel of property bearing Flat No.5, stilt first floor, "Extreme Life" apartment, Plot No.51, S.No.49/1B/1C1/1C2 Gajanan Colony, Vadgaon Gupta Road, Navnagapur, MIDC, Ahmednagar -414111 within local jurisdiction of Ahmednagar Municipal & Corporation, Ahmednagar Sub Registration Area tal. And Dist. Ahmednagar standing in the name of Mr. Ahmadhusen.Chaugule Mrs.Munni Chaugule<br>**Bounded by:**<br>East: Side Margin<br>West: Staircase<br>North: Side Margin<br>South: Flat no.6 |
| Housing Loan (79270600002825) | 20.00 lacs | 9.80%(as per sanction) | 20,14,885.71 + other charges if any as on date | 1.Equitable Mortgage of All that part and parcel of property bearing Flat No.6, stilt first floor, "Extreme Life" apartment, Plot No.51, S.No.49/1B/1C1/1C2 Gajanan Colony, Vadgaon Gupta Road, Navnagapur,MIDC, Ahmednagar -414111 within local jurisdiction of Ahmednagar Municipal & Corporation, Ahmednagar Sub Registration Area tal. And Dist. Ahmednagar standing in the name of Mr. Shakil Ahmadhusen.Chaugule Mrs. Munni Chaugule<br>**Bounded by:**<br>East: Side Margin<br>West: Flat no.4<br>North: Flat no.5<br>South: Side Margin |

1. In the letter of acknowledgement of debt dated 24/03/2023 - you have acknowledged your liability to the Bank to the tune of Rs 20,00,000/- & Rs.20,00,000/- as on NA. The outstanding stated above is subjected to further drawing and interest thereon and other charges debited to the account are as per norms.
2. As you are aware, you have committed defaults in payment of principle and interest on above loans/outstanding for the date ended 11.08.2024
3. Consequent upon the defaults committed by you, your loan account has been classified as non-performing asset on 08.08.2023 in accordance with the Reserve Bank of India directives and guidelines. In spite of our repeated requests and demands you have not repaid the overdue loans including interest thereon.
4. Having regard to your inability to meet your liabilities in respect of the credit facilities duly secured by various securities mentioned in para 1 above, and classification of your account as a non-performing asset, we hereby give you notice under sub-section (2) of section 13 of the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002, and call upon you to pay in full and discharge your liabilities to the Bank aggregating Rs. 39,84,315.71/- (Rupees Thirty Nine Lac Eighty four Thousand Three Hundred Fifteen and paise seventy one only) and other charges as stated in para 1 above, within 60 days from the date of this notice. We further give you notice that failing payment of the above amount with interest till the date of payment, we shall be free to exercise all or any of the rights under sub-section (4) of section 13 of the said Act, which please note.
5. Please note that, interest will continue to accrue at the rates specified in para 1 above for each credit facility until payment in full.
6. We invite your attention to sub-section 13 of the said Act in terms of which you are barred from transferring any of the secured assets referred to in para 1 above by way of sale, lease or otherwise (other than in the ordinary course of business), without obtaining our prior written consent. We may add that non-compliance with the above provision contained in section 13(13) of the said Act, is an offence punishable under section 29 of the Act.
7. We further invite your attention to sub section (8) of section 13 of the said Act in terms of which you may redeem the secured assets, if the amount of dues together with all costs, charges and expenses incurred by the Bank is tendered by you, at any time before the date of publication of notice for public auction/inviting quotations/tender /private treaty. Please note that after publication of the notice as above, your right to redeem the secured assets will not be available.
8. Please note that this demand notice is without prejudice to and shall not be construed as waiver of any other rights or remedies which we may have, including without limitation, the right to make further demands in respect of sums owing to us.

Yours faithfully,

STAMP

Authorized Officer
Date: 14.08.2024




### पीपल्स रिपब्लिकन पक्षांमध्ये युवक जिल्हा सचिवपदी सागर ढगे यांची निवड

पीपल्स रिपब्लिकन पक्षांमध्ये युवक जिल्हा सचिवपदी सागर ढगे यांची नियुक्ती प्राध्यापक जोगेंद्र कवाडे व कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले आहे. सागर ढगे हे गेल्या अनेक वर्षापासून चळवळी क्षेत्रामध्ये सामाजिक काम करत आहे. या कामाचे दखल घेत जिल्हाध्यक्ष सुमित गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



पंडीत दीनदयाळ व्याख्यानमालेसाठी जेष्ठ पत्रकार पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ अहमदनगरमध्ये आले असताना प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या द्वारे जगभरात १४३ देशात शिकविल्या जाणाऱ्या भारताच्या प्राचीन राजयोगाची पुस्तके ब्रह्माकुमारी सुप्रभा दीदी यांच्या हस्ते भेट देण्यात आली. यावेळी ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके, वसंत लोढा व धनंजय तागडे उपस्थित होते.

# विद्यार्थी – शिक्षक हे एकमेकाचे दैवत; विद्यार्थी हेच शिक्षकांचे अंलकार

## माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या भावना, डॉ.आडकर यांची १०९ वी जयंती साजरी



जुन्या पिढीतील हिंदी, उर्दु भाषेचे अभ्यासक डॉ. शंकर केशव आडकर यांची १०९ वी जयंती त्यांच्या पंचाहत्तरी ओलांडलेल्या विद्यार्थ्यांनी केली.

नगर – गुरु हा विद्यार्थी वरुन ओळखला जातो, विद्यार्थी हेच शिक्षकांचे अंलकार आहेत. शिक्षक हे विद्यार्थ्यांना दैवतासारखे असतात. तसेच विद्यार्थीसुद्धा शिक्षकांसाठी दैवत असतात. स्वतःचं दुःख विसरुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात सर्मपित वृत्तीने कार्य करणारे डॉ.आडकरांसारखे मार्गदर्शक समाजात विरळ असतात, अशी भावना पंचाहतरी ओलांडलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या. जुन्या पिढीतील हिंदी उर्दू भाषेचे प्रकांड पंडित संत नागदेवांच्या रचनावरील भाष्यकार डॉ.शंकर केशव आडकर यांच्या १०९ व्या जयंती निमित्त बालिकाश्रमरोड वरील डॉ.आडकर संकुलात आयोजित माजी विद्यार्थ्यांनी डॉ.शंकर केशव आडकर चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने आयोजित अभिवादन सोहळा झाला. १०९ च्या जयंती व निवृत्ती नंतरचे ५० वर्षानंतरही डॉ.आडकर यांची विद्यार्थ्यांकडून होणार स्मरण आजच्या काळात कृतज्ञतेचे प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन अहमदनगर महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ.ऋचा राजीव शर्मा यांनी केले.

पंचाहतरी ओलांडलेले निवृत्त प्राचार्य डॉ. विश्वास काळे, डॉ.सुरेश जैन व बाळकृष्ण सिद्दम या आडकर सरांच्या माजी विद्यार्थ्यांनी आडकर सरांच्या हिंदी विषयाच्या अध्यापन, उर्दू शायरी व त्यांच्या हिंदी साहित्याबद्दल शिकवण्याची त्यांची आगळ्या वेगळ्या पद्धती विषयी शालेय व महाविद्यालयीन जीवनातील त्यांच्या सहवासाच्या विविध जुन्या आठवणींना उजाळा दिला.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक प्रा.रतनलाल सोनाग्रा यांनी डॉ.आडकर यांच्या कष्टाळू व कर्तव्यनिष्ठ व्यक्तीमत्वाचा गौरव करुन नगरचे सानेगुरुजी अशा शब्दात नगर रेडिओला दिलेल्या मुलाखतीत गौरव केला तर साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा. विलास गिते यांनी विविध भाषातील अनुवादनाची प्रेरणा डॉ.आडकर यांनी दिल्याने देशातील विविध भाषेतील ज्येष्ठ सहित्यिक व अनुवादक यांचा सहवास मिळाल्याचे कृतज्ञतापुर्वक विविध आठवणींचा मुलाखतीत उजाळा दिला.

स्नेहालयाचे संस्थापक व आडकर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.गिरीश कुलकर्णी यांनी उर्दु भाषेच्या विकास व संवर्धनासाठी व्यासपीठ उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. स्नेहालयाचे संवर्धक राजीव गुजर यांनी स्वागत केले. आडकर ट्रस्टचे सचिव अशोक कुरापाटी यांनी आभार मानले.

भरत कुलकर्णी व संतोष धर्माधिकारी यांनी सुत्रसंचालन केले.

# श्री रामदेवजी अवतरण दिवसानिमित्त ५ सप्टेंबरपासून विविध कार्यक्रमाचे आयोजन



नगर – श्री रामदेवरा दरबार, सारसनगर येथे राजस्थान येथील प्रमुख देवता श्री रामदेवजी, श्री सालासर हनुमानजी व श्री साच्चीयाय माता या देवता स्थापित आहेत. सालाबाद प्रमाणे श्री रामदेवजी यांच्या अवतरण दिना निमित्त भादवा मेळा कार्यक्रमा अंतर्गत ५ ते १३ सप्टेंबरपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

५ सप्टेंबर रोजी श्री रामदेवजी (द्वारकाधीश अवतार) यांच्या जन्म दिवसाच्या निमित्ताने सकाळी ७ वाजता महाअभिषेक, दुपारी ३ वाजता पावन गणपती, सारसनगर येथून श्री रामदेवरा दरबारपर्यंत शोभा यात्रा तसेच संध्याकाळी ६ वाजता अमरावती येथील जम्मा गायक सौ. संगीता खंडेलवाल यांचा जम्मा कार्यक्रम व रात्री ८ वाजेपासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

याच भादवा मेळा कार्यक्रमाअंतर्गत ६ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ८ वाजता श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ यांची भजन संध्या, ७ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ८ वाजता श्री.वैष्णवी महिला मंडळ यांची भजन संध्या, ८ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ८ वाजता श्री मंगल भक्त सेवा मंडळ यांची भजन संध्या व श्री राजस्थानी मित्र मंडळ तर्फे महाप्रसाद, ९ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ८ वाजता आर्ट ऑफ लिव्हिंग चे भूषण मालू यांची भजन संध्या, १० सप्टेंबर रोजी संध्याकाळी ८.०० वाजता श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ यांची भजन संध्या, ११ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ८ वाजता श्री सालासर भक्त मंडळ यांचे सुंदरकांड पाठ, १२ सप्टेंबर रोजी सकाळी विष्णू याग व रात्री ८ वाजता श्री रामभक्त हनुमान सत्संग मंडळ यंची भजन संध्या व महाप्रसाद.

१३ सप्टेंबरला संध्याकाळी ५ वा. श्रीराम मंदिर दाळ मंडई ते रामदेवरा दरबारपर्यंत ध्वजा बाईक यात्रा व ८ वा. श्री रामदेव भक्त मंडळ ट्रस्ट यांचे जम्मा, जागरण आहे. भाविकांनी कार्यक्रमांना उपस्थित रहावे, असे आवाहन श्री रामदेव भक्त मंडळ ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना जुनिअर कॉलेजच्या १० वी, ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सी.ए. इन्स्टिट्यूटतर्फे सी.ए. अभ्यासक्रमाची माहिती देताना शिक्षकवर्ग.

# 'श्री रामकृष्ण एज्युकेशन फौंडेशन'च्या विद्यार्थ्यांना समजले सीए होण्याचे फायदे

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना जुनिअर कॉलेज या इयत्ता दहावी अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सीए इन्स्टिट्यूटतर्फे सुपर मेगा करिअर कौन्सिलिंग प्रोग्रामच्या अंतर्गत सीए या व्यावसायिक अभ्यासक्रमाची माहिती व भविष्यातील संधी यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी सीए इन्स्टिट्यूट अहमदनगर चे चेअरमन सीए सनित मुथा, व्हाईस चेअरमन सीए प्रसाद पुराणिक, सेक्रेटरी सीए अभयकुमार कटारिया, माजी अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे यांनी संस्थेला भेट दिली व विद्यार्थ्यांशी हितगुज साधले.

सीए सौ.रीचा फिरोदिया– शेळके यांनी आपल्या व्याख्यानात सीए परीक्षेत संदर्भात महिती दिली. त्याचबरोबर सीए झाल्यानंतर भविष्यात उपलब्ध असणाऱ्या भरपूर संधी विषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. ओघवत्या भाषाशैलीत प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी याबाबतची संपूर्ण माहिती पुरवली.

या व्याख्यानाच्या आयोजनासाठी ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षिका सौ. वृषाली पितळे यांनी मेहनत घेतली. यावेळी सीए इन्स्टिट्यूट अहमदनगरचे चेअरमन सीए सनित मुथा यांनी उपमुख्याध्यापक संपदा देशपांडे यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष स्कूल कमिटीचे चेअरमन नंदकुमार झंवर, संस्थेचे सर्व पदाधिकारी व मुख्याध्यापिका सौ. राधिका जेऊरकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



## एक मनोहारी पहाट

*एक मनोहारी पहाट
हसत सामोरी
येणारी
ढगांच्या एका
रेघेतून
आभाळभर
पसरणारी...
तो ऊबदार स्पर्श
हवेमध्ये जाणवणारा
तो सोनेरी प्रकाश
पानापानातून
पाझरणारा...*

## अशीही फसवणूक



लग्नाच्या गाठी या स्वर्गात बांधल्या जातात, असे म्हटले जाते. पण अलिकडच्या काळात लग्न जमण्यासाठी काय काय करावे लागते, हे ज्याचे त्यालाच माहीत. अनेकवेळा वय निघून गेले असताना कागदोपत्री वय कमी केले जाते आणि लग्न ठरवले जाते. लग्नानंतर ही गोष्ट उघड जरी झाली, तरी मग ते निभावून नेले जाते; पण गुजरातमध्ये अशाच एका प्रकरणात पतीने चक्क पत्नी आणि त्यांच्या कुटुंबीयांवर गुन्हा दाखल केला. लग्नाच्या वेळी मुलीचे वय कमी दाखवले; पण गरोदर राहत नसल्याने चाचणी केल्यानंतर मात्र बिंग फुटले. पत्नी ही पतीपेक्षा तब्बल आठ वर्षांनी मोठी असल्याचे समोर आले. पतीने या प्रकरणी पत्नी आणि तिच्या कुटुंबीयावर गुन्हा दाखल केला.

अहमदाबादच्या सरखेज भागात राहणाऱ्या एका महिलेला वर्षभरापासून गर्भधारणा होत नव्हती. तेव्हा तिचा पती तिला डॉक्टरांकडे घेऊन गेला. त्या वेळी केलेल्या वैद्यकीय अहवालात ती महिला ४० वर्षांची असल्याचे समोर आले. वैद्यकीय मदतीशिवाय ती आई होऊ शकत नाही, असे डॉक्टरांनी सांगितले. सोनोग्राफी अहवालातील खुलासा झाल्यानंतर पतीच्या पायाखालची जमीनच सरकली. लग्नाच्या वेळी पत्नीचे वय ३२ वर्षे असल्याचे सांगण्यात आले होते; मात्र सोनोग्राफीमध्ये तिचे वय ४० वर्षांपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. पतीने अहमदाबाद पोलिसांकडे तक्रार दाखल करून पत्नीचे वय लपविल्याबद्दल कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.

पतीच्या तक्रारीवरून पोलिसांनी पत्नी, तिचे वडील आणि तिच्या नातेवाइकांसह आठ जणांविरुद्ध फसवणूक, गुन्हेगारी कट आणि धमकावण्याशी संबंधित अनेक कलमांतर्गत गुन्हा नोंदवला. लग्नासाठी देण्यात आलेल्या बायोडेटामध्ये त्या मुलीची जन्मतारीख १८ मे १९९१ असे नमूद होते. तिचे वय हे मुलापेक्षा १८ महिन्यांनी लहान असल्याचे दाखवण्यात आले; पण मुलाकडच्या लोकांनी वारंवार मागणी करूनही मुलीच्या बाजूच्यांनी तिचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा इतर शैक्षणिक पुरावे दिले नव्हते. नंतर यासंबंधित सर्व दाखले हे बनावट पद्धतीने काढण्यात आले आणि पतीला देण्यात आले.

पतीच्या म्हणण्यानुसार, अनेक महिने प्रयत्न करूनही गर्भधारणेचे प्रयत्न अयशस्वी ठरले. त्यामुळे घरी कुणालाही न सांगता त्याने पत्नी आणि मेहुणीसह जुहापुरा येथील डॉक्टरांकडून स्वत:ची तपासणी करून घेतली. सप्टेंबर २०२३ मध्ये पुन्हा पालडी येथील स्त्रीरोगतज्ज्ञाचा सल्ला घेतला. त्या वेळच्या सोनोग्राफी अहवालात पत्नीचे वय ४० ते ४२ वर्षांच्या आसपास असल्याचे समोर आले. पत्नी नैसर्गिकरित्या गर्भधारणा करू शकणार नाही, असे डॉक्टरांनी सांगितले. त्यामुळे लग्नाच्या वेळी खोटे वय दाखवून आपली फसवणूक करण्यात आल्याचा आरोप पतीने केला.

## शारीरिक संबंधासाठी पत्नी मागायची पैसे!

अनेक गोष्टींवरून जोडपी आपापसात भांडतात. अनेक गोष्टींवर त्यांचे मतभेद होतात; पण काही वेळाने प्रकरण शांत होते आणि जनजीवन सामान्य होते. त्यानंतर दोघेही एकमेकांवर प्रेमाचा वर्षाव करू लागतात; पण नुकतीच एक विचित्र घटना समोर आली. जिथे पत्नी तिच्याशी शारीरिक संबंध ठेवण्यासाठी तिच्याच पतीकडे पैसे मागते. एवढेच नाही तर ती त्याच्याशी बोलण्यासाठी पैसेही मागते.

पत्नीच्या अशा वागण्याला वैतागलेल्या पतीने अखेर घटस्फोटासाठी न्यायालयात अर्ज केला आहे. ही बाब सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली. तैवानच्या एका व्यक्तीने कोर्टात घटस्फोटाची याचिका दाखल केली होती. त्यात त्या व्यक्तीने असे नमूद केले आहे, की त्याची पत्नी त्याच्याशी शारीरिक संबंध ठेवण्यासाठी पैशांची मागणी करते. २०१४ मध्ये दोघांचे लग्न झाले तेव्हा सर्व काही ठीक चालले होते. त्यानंतर दोघांनाही दोन मुले झाली. त्यानंतर त्यांच्या पत्नीची शारीरिक संबंधात असलेली आवड पूर्णपणे कमी झाली. २०१७ नंतर ती महिन्यातून एकदा शारीरिक संबंध ठेवायची; पण २०१९ नंतर तिने शारीरिक संबंध ठेवण्यास पूर्णपणे नकार दिला. आता एकदा शारीरिक संबंध ठेवण्यासाठी तिने त्याच्याकडे १.२५ लाख रुपयांची मागणी केली. यानंतर त्या व्यक्तीने कोर्टात घटस्फोटाची याचिका दाखल केली. न्यायालयाने शारीरिक संबंध नसल्याच्या कारणावरून घटस्फोट मंजूर केला.



महिलेने सांगितले की तिचा नवरा खूप लठ्ठ आहे आणि योग्य रितीने संबंध निर्माण करू शकत नाही. या प्रकरणावरून भांडण इतके वाढले, की आम्हाला न्यायालयात जावे लागले. यानंतर न्यायालयाने महिलेला तिच्या पतीचा सांभाळ करण्यास सांगितले आणि त्याच्याशी संबंध ठेवण्यास सांगितले. त्याला महिलेने सहमती दर्शवली आणि तडजोड केली; पण काही दिवसांनंतर पतीने आरोप केला की पत्नीने आपला करार मोडला आणि मालमत्ताही त्यांच्या नावावर हस्तांतरित केली आहे. त्यानंतर दोघांचा घटस्फोट झाला.

# कॅलिडोस्कोप




या जगात अनेक आश्चर्य आहेत. या आश्चर्यांची उकल करणं विज्ञानालाही शक्य झालेलं नाही. असंच एक ठिकाण म्हणजे मेक्सिकोमधलं 'झोन ऑफ सायलंस'. हे ठिकाण खूपच विचित्र असून इथे चित्रविचित्र घटना घडत असतात. इथे कोणतंही विद्युत उपकरण काम करत नाही. या भागात रेडिओ फ्रिक्वेंसी काम करत नसल्यामुळे असं घडत असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. यामागचं कारण मात्र

## 'झोन ऑफ सायलंस'चं गौडबंगाल

अजून कळलेलं नाही. हे स्थान चिहुआहुआ वाळवंटात असून इथली गुपितं उलगडण्याचे अनेक प्रयत्न फोल ठरले आहेत. १९३८ मध्ये या भागात उल्कापिंड कोसळलं होतं. त्यानंतर हे ठिकाण चांगलंच चर्चेत आलं होतं. त्यानंतर १९५४ मध्येही इथे उल्का पडली होती. या घटनांनंतर इथे चित्रविचित्र घटना घडू लागल्याचं लोकांचं म्हणणं आहे. या भागातून जाणारं अमेरिकेचं रॉकेट खाली कोसळल्यानंतर याबाबत संशोधन सुरू झालं. त्यानंतर या भागात विद्युत उपकरणं काम करत नसल्याची बाब लक्षात आली आणि सगळ्यांनाच आश्चर्य वाटलं. १९६६ मध्ये एक तेल कंपनी खनिज तेलाच्या शोधासाठी या भागात आली होती. मात्र इथे कोणतंही उपकरण काम करत नव्हतं. त्यामुळे कंपनीच्या चमूला संशोधन करणं अशक्य होऊन बसलं. त्यानंतर या परिसराला 'झोन ऑफ सायलंस' म्हटलं जाऊ लागलं.

## चित्रविचित्र जीव











जगभरात प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या, समुद्री जीवांच्या, किटकांच्या असंख्य प्रजाती पहायला मिळतात. काही जीव खूप विचित्र दिसतात तर काहींच्या सवयी आपल्याला थक्क करून जातात. अशाच काही सजीवांविषयी...

* 'रेडलीप बॅटफिश'च्या ओठांचा आकार माणसाच्या ओठांसारखाच असतो. गंमत म्हणजे त्याचे ओठ लिपस्टिक लावल्याप्रमाणे लाल दिसतात. पॅसिफिक महासागरातल्या 'गॅलापागोस' बेटांजवळ हा मासा आढळतो.

* चिली या देशात काळ्या–पांढऱ्या रंगाच्या पांडा मुंग्या आढळतात. त्यांच्या शरीरावर केस असतात. पांडा मुंगी चावल्यानंतर असह्य वेदना होतात. तसंच त्या विषारीही असतात.

* 'हमिंगबर्ड हॉक' नावाच्या पक्ष्याला माणसांप्रमाणे प्रत्येक रंग कळतो.

* 'ग्लासस ॲटलांटिकस' हा समुद्री जीव आहे. निळ्या रंगाचा हा जलचर खूप विचित्र दिसतो. पोटात वायू असल्याने तो पाण्यावर तरंगतो.

* 'साएगा' अँटेलोपच्या तोंडाचा आकार खूप विचित्र असतो. बेढब नाकामुळे त्याचा चेहरा वेगळाच वाटतो.

## उफ... ये जुल्फे!



प्रत्येकालाच सुंदर, मुलायम, घनदाट केसांची ओढ असते. डोक्यावरच्या या केसांमध्ये बरंच काही दडलेलं आहे. अशा या केसांविषयी गमतीशीर आणि रंजक माहिती जाणून घेऊ. माणसाच्या डोक्यावर सर्वसाधारणपणे एक ते दीड लाख केस असतात. दिवसाला सरासरी १०० ते १५० केस गळतात. 'बोन मॅरो'नंतर शरीरातला सर्वात वेगाने वाढणारा टिश्यू म्हणजे केस. केसाचा निरोगी धागा ओला असताना ३० टक्के अधिक प्रमाणात ताणला जातो. मुळापासून उखडला जाण्याच्या क्षणापासूनच त्या जागी दुसऱ्या केसाच्या वाढीला सुरूवात होते. वेगवेगळ्या वेळी डोक्यावरच्या ९० टक्के केसांची वाढ होत असते तर उर्वरित दहा टक्के केस विश्रांती घेत असतात. एका केसाचं आयुष्य साधारणपणे पाच वर्षांचं असतं. केस 'केराटिन' नामक घटकापासून बनलेले असतात. प्रत्येकाच्या केसाची रचना, प्रकार, शैली वेगवेगळी असली तरी आपल्या केसांमध्ये प्रत्यक्षात बरंच साम्य असतं.

## ठसका तिखट मिरचीचा

मिरची चांगलीच तिखट असते. मिरची चुकून जरी तोंडात गेली तर जीभ चांगलीच पोळते. म्हणूनच सहसा कोणी मिरचीच्या वाट्याला जात नाही. मिरचीच्या वेगवेगळ्या प्रजाती आहेत. काही मिरच्या कमी तर काही भरपूर तिखट असतात. 'रीपर' ही जगातली सर्वात तिखट मिरची मानली जाते. ही मिरची नुसती खाणं तर दूरच तिचा स्वयंपाकात वापर करायचा की नाही याबाबतही दहा वेळा विचार करावा लागेल. पण एका व्यक्तीने ही तिखट




जाळ मिरची नुसती खाल्ली. कॅनडातल्या एका व्यक्तीने फक्त दहा सेकंदांमध्ये तीन 'रीपर' मिरच्या खाऊन स्वत:चाच विक्रम मोडला आहे. ही मिरची खाणं धोकादायक ठरू शकतं. काही वेळा माणसाचा मृत्यूही होऊ शकतो. हे माहीत असूनही माईक जॅक नावाच्या व्यक्तीने हा धोका पत्करला. या मिरचीच्या तिखटपणामुळे नसा आखडू शकतात. मात्र माईकने कशाचीही पर्वा केली नाही. 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस'ने माईकचा रिपर मिरची खातानाचा व्हिडिओ शेअर केला आहे. हा व्हिडिओ बघून आपल्यालाही धडकी भरेल. या जगात भलतंच धाडस करणाऱ्यांची कमतरता नाही हेच खरं!

## पासपोर्टशिवाय शाळेत नो एंट्री



दुर्गम भागातल्या विद्यार्थ्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घ्यावं लागतं. काहींना नदी ओलांडून शाळेत जावं लागतं तर काहींना बरीच पायपीट करावी लागते. निसरड्या रस्त्यावरून चालावं लागतं. पण अमेरिकेतल्या एका शाळेत येणाऱ्या मुलांना पासपोर्ट दाखवावा लागतो. इथल्या 'कोलंबस एलिमेंट्री स्कूल'मधले ६०० पैकी ४२० विद्यार्थी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून शिकायला येतात. त्यामुळे त्यांना पासपोर्ट दाखवणं बंधनकारक आहे. मेक्सिकोतल्या 'प्योर्तो पालोमस' भागातल्या या मुलांना कायम पासपोर्ट सोबत बाळगावा लागतो. हे ठिकाण मेक्सिकोत असल्याने या मुलांना किंवा इथे राहणाऱ्या कोणालाही पासपोर्टशिवाय अमेरिकेत येता येत नाही. त्यातही या मुलांना बऱ्याच समस्यांना सामोरं जावं लागतं. शाळेत जाताना दप्तरात एखादं पुस्तक नसलं तरी चालेल. पण त्यांना सर्वात आधी पासपोर्ट ठेवला की नाही याची चाचपणी करावी लागते. सीमेवर आल्यानंतर तिथल्या पोलिसांना पासपोर्ट दाखवल्यानंतरच सीमा पार करण्याची परवानगी दिली जाते. शाळेची बस सीमेलगतच्या बस थांब्यावर येते. मग ही मुलं त्यात बसून शाळेत जातात. घरी परततानाही त्यांना हीच कसरत करावी लागते. मेक्सिकोतल्या बहुसंख्य शाळांमध्ये स्पॅनिश भाषेत शिक्षण दिलं जातं. पण अमेरिकेत इंग्रजीत शिक्षण दिलं जात असल्याने पालक त्यांना या शाळेत पाठवतात.

## शहरातलं पर्यावरपूरक घर

आपल्यापैकी अनेकांना निसर्गाच्या सानिध्यात रमायला आवडतं. नैसर्गिक वातावरणात जगायला आवडतं. शुद्ध हवा,पाणी,हिरवाईने नटलेला परिसर आपल्याला आकर्षित करत असतो. पण निसर्गरम्य वातावरणात कायमचं राहता येत नाही. पोटापाण्यासाठी शहरांमध्ये रहावं लागतं. सिमेंटच्या जंगलातल्या घुसमटलेल्या, प्रदूषित हवेत जगावं लागतं. मग वर्षातून एखाददोन वेळा गावाला किंवा निसर्गरम्य ठिकाणी जावून मोकळा श्वास घेतला जातो. शहरात राहणाऱ्यांना प्रत्येक सुविधा हवी असते. घरात पंखे, एसी बसवून घेतले जातात. दिवे, ट्यूबलाईट असतात. त्याशिवाय जगताच येत नाही.  मात्र बंगळूरुतल्या एका जोडप्याने या सगळ्याला फाटा दिला आहे. त्यांनी अनोखं घर तयार केलं आहे. त्यांचं हे घर पर्यावरणपूरक असून त्यांनी पंखा किंवा दिवा बसवलेला नाही. त्यांच्या या घरात दिवसभर उजेड असतो. हवा खेळती राहते. रंजन आणि रेवा मलिक या जोडप्याने हे असे स्वप्नातलं घर साकारलं आहे. रेवा स्वयंपाकासाठी सौरऊर्जेचा वापर करतात. या कुटुंबाकडे सौरकूकर आहे. दररोजच्या हवामानानुसार स्वयंपाक काय करायचा हे ठरवलं जातं. भरपूर ऊन असेल तर त्या सौर कूकरमध्ये बाजरीची खिचडी बनवतात. या घरात क्रॉस व्हेंटिलेशनमुळे हवा नेहमीच खेळती राहते आणि तापमानही वाढत नाही. जवळपास ७७० चौरस फूट परिसरात पसरलेलं हे घर मातीपासून तयार करण्यात आलं आहे. मातीचं घर ही संकल्पना गावांमध्ये पहायला मिळते. पण या जोडप्याने बंगळूरूसारख्या महानगरामध्ये मातीचं घर बांधलं आहे. या घराच्या छप्परासाठी टेराकोटा टाईल्सचा वापर करण्यात आला आहे. यामुळे उन्हाळात घर थंड तर थंडीत गरम राहतं. यामुळे त्यांना एसी बसवावा लागत नाही. त हे जोडपं सूर्योदय झाल्यावर उठतं आणि सूर्यास्ताला झोपून जातं. त्यामुळे त्यांना रात्री दिवे लागतच नाही. गरजा कमी केल्यावर आपण पर्यावरणाशी जोडले जाऊ शकतो हे रंजन आणि रेवा या जोडप्याने दाखवून दिलं आहे.



## अवयवदानाचा असाही संकल्प

लग्न म्हटलं की थाटमाट आलाच. वऱ्हाडी मंडळी वधूवरांना भेटवस्तू देतात. त्यात रोख रकमेपासून भांडी आणि इलेक्ट्रिक उपकरणांपर्यंत बरंच काही असतं. पण काही जण वेगळ्या पद्धतीने, सामाजिक जाणीवा जागृत ठेऊन लग्न करतात. टिंकू ओझा आणि तृप्ती यांच्या लग्नातही वेगळेपण पहायला मिळालं. सध्या अवयवदानाबाबत बरीच जागरूकता निर्माण केली जाते आहे. बऱ्याच संस्था यासाठी झटत आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'शाइन इंडिया फाउंडेशन'. ही संस्था गेल्या काही वर्षांपासून राजस्थानमधल्या कोटामध्ये अवयवदानाबाबत जागरूकता निर्माण करत आहे. टिंकू ओझा याच संस्थेशी संबंधित आहे. टिंकूचं लग्न तृप्तीशी झालं. त्यांनी लग्नपत्रिकेतच लग्नाची भेट म्हणून पाहुण्यांना अवयवदानाचा संकल्प करण्याची विनंती केली होती. यामुळे त्यांची ही लग्नपत्रिका खूप गाजली. शहरी भागातल्या लोकांना अवयवदानाबाबत माहिती असली तरी ग्रामीण भाग याबाबत अजूनही अनभिज्ञ आहे. त्यामुळे इथल्या गावांमधल्या लोकांनी लग्नाला यायला नकार दिला. आता हे लग्न कसं पार पडणार, असा प्रश्न निर्माण झाला. लग्नाच्या आदल्या दिवशी शाईन इंडिया फाउंडेशनची पाचजणांची टीम गावभर फिरली. इथल्या वृद्धांना तसंच इतरांना अवयवदानाचं महत्त्व पटवून दिलं. यानंतर संस्थेच्या शिबिरात लोकांनी अवयवदान करण्याचा संकल्प केला तसंच फॉर्मही भरून दिला. जवळपास ३५ लोकांनी अवयवदान, ११० लोकांनी नेत्रदान तर तीन वृद्धांनी देहदान करण्याचा संकल्प केला. वऱ्हाडातल्या लोकांनी आपल्या पाहुण्यांनाही याबाबत सांगितलं. त्यानंतर ३० लोकांनी नेत्रदानाचा संकल्प केला. यावेळी नवरा–नवरीनेही अवयवदान करण्याचा फॉर्म भरला. टिंकू आणि तृप्ती यांच्या या अनोख्या उपक्रमामुळे काहीजणांना जीवनदान मिळणार आहे.



## 'सिद्धार्थ वाणी'



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

आज पर्वपर्युषणचा चौथा दिवस आहे. आज ह्या पर्वामध्ये आपल्याला फार काही पाहिजे, परंतु काही तरी सोडावे लागते, तेव्हा कुठे काही तरी मिळते.

क्रोध, मान, माया, लोभ ह्यातून एक तरी सोडले तरी आपल्याला काही मिळवते येते, क्रोध कुठे असतो :- डोक्यावर, अभिमान कोठे असतो :- मानेत, माया कोठे असतो :- पोटात, लोभ कोठे असतो :- शरीरात.

आपण सर्व साधक आहोत. साधनासाठी साधकाला काय पाहिजे? सर्वात आधी साधकाला तन अर्थात शरीर पाहिजे. शरीर विना साधना होत नाही, मन पाहिजे, बुद्धि पाहिजे, हृदय व जीवन देखील पाहिजे. आज आपल्याला तन, मन, बुद्धि आणि जीवन मिळाले आहे. परंतु मिळालेल्या गोष्टीचा सद्उपयोग करणे महत्त्वपूर्ण आहे. शरीराच्या माध्यमातून सेवा करावी. ''करो सेवा दुखी जन जहा मिले उन्हे गले लगाओ!'' शरीराने सेवा करत असाल तर शरीराचा उपयोग आहे. मनाने संकल्प करा तर मनाचा सदुपयोग आहे. बुद्धिचा उपयोग विनम्रता आहे. अशा तऱ्हेने तन, मन, बुद्धि, वेळ आणि समझदारीचा उपयोग करून आपण आपले लक्ष प्राप्त करू शकतो.

आपण जर सदुपयोग केला नाही तर जन्म-जन्मांतर आपण भटकत राहू. ''जन्म दुःख जर दुःख रोगाणी भरणजीय'' जन्म व्याधी मरण हे सर्व दुःख आहे. कित्येक जन्माचे दुःख सुद्धा विसरून जातो. जेव्हा आपण आईच्या उदरात असतो, देवाकडे प्रार्थना केली होती कि हे देवा मला लवकर बाहेर काढ. मी बाहेर आल्यावर तुझी अशी भक्ति व साधना करेल कि पुन्हा जन्म घेण्याची गरज पडणार नाही, असे दिलेले वचन आपण विसरून गेलो. या संसारात येऊन आपण रागाच्या आगीत खेळायला लागलो, पण आपण कोणाशी खेळतो, खेळायचे असेल तर त्यागाच्या बागेत खेळायचे तर कदाचित रागाच्या आगीत खेळायची जाणीव झाली नसती. जो साधक पुण्य आत्म्याची काळजी घेतो, त्याच्या जीवनात पुण्य वाढते. ह्याची एक घटना पाहू कथाद्वारे.

विरजीभाई हा फार गरीब असतो. तो वैश्रणव ह्यांच्या घरात कामाला असतो. विरजीभाईला फक्त एक काम असते कि रोज न चुकता एक हंडा भरून दूध तापी नदीत टाकायचे, हे काम न चुकता होत होते. एके दिवशी दूध टाकण्यासाठी जात असताना रस्त्यात त्याला एक साप जखमी अवस्थेत दिसला. त्याच्या मनात आले, ह्यातले थोडे दूध सापाला दिले तर त्या दुधामुळे साप व्यवस्थित होतो. सापाच्या मनात आले, ह्याने आपले जीवन वाचवले, आपण ह्यासाठी काय तरी करावे. साप झाडाखाली जाऊन एका दगडाखाली जाऊन जवळ बोलवत असे. विरजीभाई त्या दगडाजवळ जातात, पाहतात तर भरपूर धन असते. हे सर्व आपल्या मुलाला, पत्नीला सांगतो. ह्यावर मुलगा म्हणतो, हे काय कामाचे? ह्या धनापेक्षा मी संयमव्रत स्विकारेल व त्यांनी व्रत स्विकारून लवजी ऋषींच्या नावाने प्रसिद्ध झाले. अशा रीतीने वेळेचे सदुपयोग करून साधना, धर्म साधना करून जीवनाचे सार्थक करू या.

**- सौ. सविता चोरडिया**

# सनातन धर्म ही न संपणारी जीवनशैली आहे

### ज्येष्ठ पत्रकार पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांचे प्रतिपादन

नगर - आतापर्यंत माझ्या दीड हजार सभांमध्ये महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज व अहिल्यादेवी होळकर या महापुरुषांचा उल्लेख केला आहे. ब्राह्मणांच्या उत्पत्तिपासून जोपर्यंत ब्रह्मांड राहणार तोपर्यंत सनातनी हिंदू जिवंत राहणार आहेत. गेल्या ७० दशकात सनातनींनी गीता, रामायण बदलले आदर्श बदलले आहेत. ज्या महापुरुषांनी पराक्रम गाजवून सनातन धर्म टिकवला आहे. त्या महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी केली जाते. परंतु त्यांना आदर्श मानले जात नाही. ही मोठी खेदजनक बाब आहे. सनातन परंपरा श्रद्धा मान्यतेमध्ये धर्माचा अर्थ काय आहे हे सनातन यांना माहिती असणे आवश्यक आहे. राजाचा धर्म म्हणजे प्रजेचे रक्षण तसेच मातापित्यांचा धर्म म्हणजे कर्तव्य आहे. रिलीजन व मजहब या शब्दाचा पर्याय धर्म होत नाही. १९१० साली सर मोहम्मद इकबाल याने एक गीत लिहिले होते. चीनो अरब हमारा मुस्लिम है हम वतन है सारा जहा हमारा सनातनी लोक अर्थ माहित नसताना देखील हे गाण हे गीत गात आहेत. दी केरला स्टोरी, काश्मीर फाइल्स हे चित्रपट पाहिल्यानंतर देशातील आतंकवाद, हिंदूंवर होणारे अत्याचार याची आपणास माहिती होते. ही मोठी हिंदू समाजाची शोकांतिका आहे. मुले उच्च शिक्षित होऊन परदेशात मोठ्या पगारावर नोकरी करावी किंवा देशात मोठे पद मिळावे. परंतु आपल्या मुलांनी छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ माता, अहिल्यादेवी होळकर, झाशीची राणी, स्वामी विवेकानंद, नेता सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे विचार आत्मसात करून देशाप्रती राष्ट्र भावनेने जीवन जगावे. अशी भावना जोपर्यंत देशातील मातापित्यांना येत नाही. तोपर्यंत देशाचे हित साधता येणार नाही. सनातन धर्म नष्ट करणाऱ्यांनो जोपर्यंत ब्रह्मांड आहे तोपर्यंत सणातन नाही हे लक्षात ठेवा. सनातन हिंदू धर्म ही न संपणारी जीवनशैली आहे, असे प्रतिपादन विचारवंत ज्येष्ठ पत्रकार पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांनी केले आहे.

माऊली सभागृह येथे पंडित दीनदळ पतसंस्था व दीनदळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाळ व्याख्यान-मालेच्या समोरोप प्रसंगी चौथ्या पुष्पाचे वक्ते पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ, प्रमुख पाहुणे आमदार राम शिंदे, प्रमुख उपस्थितीत जनकल्याण समितीचे महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ.रवींद्र साताळकर, पतसंस्थेचे संस्थापक वसंत



माऊली सभागृहात पंडित दिनदयाळ पतसंस्था व दिनदयाळ परिवार प्रतिष्ठान आयोजित पंडित दिनदयाळ व्याख्यानमालेच्या समारोपाच्या व्याख्यानाचा समारोप करताना ज्येष्ठ पत्रकार पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ. समोर उपस्थित श्रोतेवृंद.

### पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचा समारोप उत्साहात

लोढा, मानद सचिव विकास पाथरकर, अभय आगरकर, बाबासाहेब वाकळे, सुनील रामदासी, पतसंस्थेचे व्हा.चेअरमन सुधीर पगारीया, संचालक मिलिंद गंधे, संचालिका शारदा होशिंग, शैलेश चंदे, परीवार प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय तागडे, महासचिव बाळासाहेब भुजबळ, सचिन पारखी, डॉ.प्रकाश कांकरिया, सुधा कांकरिया, गोकुळ काळे, अजित कृष्णन, सुहास पाथरकर, मकरंद घोडके, अशोक कानडे, अनिल निकम, महावीर कांकरिया, संग्राम म्हस्के, निलेश चिपाडे, सुरज अग्रवाल, नरेंद्र श्रोत्री, उमेश मेरगु, बाळासाहेब खताडे, गौतम कराळे, मुकुंल गंधे, अच्युतराव पिंगळे, राजू ढोरे, कुणाल भंडारी, राजकुमार जोशी, गणेश कानगांवकर, गौतम कराळे, बापु ठाणगे, सौ.मेघना गंधे, सौ.सविता तागडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ म्हणाले, देशाचे संविधानामध्ये प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज, नेताजी सुभाषचंद्र बोस, राणी लक्ष्मीबाई, जैन दर्शन, बौद्ध दर्शन अशी २२ चित्रे नंदलाल बोस व राम मनोहर यांनी साकारली आहेत.

डॉ.साताळकर म्हणाले, गेल्या अनेक वर्षापासून पंडित दीनदयाळ त व्याख्यानमाला नगरमध्ये सुरू आहे. एखाद्या पतसंस्थेने व्याख्यानमाला चालवावी. हे फार कमी ठिकाणी दिसते. व्याख्यानमालेला क्वचितच गर्दी होत असते. परंतु पंडित दीनदळ व्याख्यान मालेला नगरकरांनी केलेली गर्दी पाहता आसन व्यवस्था कमी पडत आहे असे दिसते. पंडित दीनदयाळ यांच्या विचारातून या पतसंस्थेची आर्थिक कारणासाठी स्थापना झालेली आहे. सामाजिक दायित्व लोकांचे मतपरिवर्तन किंवा चांगल्या गोष्टी रुजविणे हा उद्देश ठेवून पतसंस्थेने ही व्याख्यानमाला सुरू केली आहे.

प्रास्ताविकात वसंत लोढा म्हणाले, गेल्या चार दिवसांपासून व्याख्यानमाले ला अहिल्यानगरच्या लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. आम्ही असे विचारात होतो की व्याख्यानमालेला आठ वर्षे झाली लोक येतील का नाही? परंतु या व्याख्यानमालेला नगरकरांनी जो उदंड प्रतिसाद दिला ते लक्षात घेता. ही व्याख्यानमाला पुढे सुरू ठेवावी असे वाटते. आज पर्यंत एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद कधीच मिळाला नव्हता. पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या या उपक्रमाला विश्वासार्थक पाठिंबा दिल्याबद्दल सर्वांचे स्वागत करतो. व्याख्यानमालेचा उद्देश विचारांचे आदान प्रदान करणे एवढाच नसून वेगवेगळे सामाजिक विषय चर्चेत येऊन शहराच्या विकासाला गती मिळावी. यासाठी व्याख्यानमालेची चळवळ नगर शहरात सुरू आहे.

या व्याख्यानमालेसाठी नगरकरांनी मोठी गर्दी केली होती. माऊली सभागृहाच्या पार्किंग हॉलमध्ये एल डी वॉल लावून श्रोत्यांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाचे स्वागत धनंजय तागडे यांनी केले. सूत्रसंचालन शारदा होशिंग यांनी केले. तर आभार बाळासाहेब भुजबळ यांनी मानले.

### विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी अहिल्यानगर या नामाकरणाची घोषणा : आमदार राम शिंदे

आमदार प्रा. राम शिंदे म्हणाले, अहमदनगरचे नाव लवकरच अहिल्यानगर होईल, यात काही शंका नाही. तीनशे वर्षांपूर्वी अहिल्यादेवी होळकर यांनी असामान्य कर्तृत्व केले. एखादे नाव किती श्रेष्ठ असावे. हे याचे उदाहरण आहे. अहमदनगरचे नाव अहिल्यानगर करावे, यासाठीच्या प्रस्तावाला सर्व राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ अहिल्यानगर या नावाची घोषणा केली आहे. अहिल्यानगर नामकरणाचा प्रस्ताव राज्याने केंद्र सरकारकडे पाठवला आहे. येत्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी अहिल्यानगर या नामाकरणाची घोषणा होईल, असे त्यांनी सांगितले.

# पुण्यातील गांधी ज्वेलर्सच्या सुवर्ण अलंकार व डायमंड ज्वेलरीचे ९ सप्टेंबरपासून नगरमध्ये खास विक्री प्रदर्शनाचे आयोजन

नगर - पुणे येथील गांधी ज्वेलर्सने (पाबळवाले) नगरमध्ये ९ ते ११ सप्टेंबर दरम्यान हॉटेल आयरीश येथे आपल्या खास ज्वेलरीचे एक्झिबिशन आयोजित केले आहे. सकाळी ९.३० ते रात्री ९ यावेळेत प्रदर्शन व विक्री सर्वांसाठी खुले राहील अशी माहिती आशिष गांधी यांनी दिली.

प्रकाश गांधी यांनी सांगितले की, गांधी ज्वेलर्सने विश्वासाहर्ता आणि शुद्धता जपत ग्राहकांना कायम सुवर्ण सेवा दिली आहे. मागील ८ वर्षांपासून नगरकर ग्राहकांना एक्झिबिशन भरवून अस्सल सोनं तसेच डायमंडचे दागिने उपलब्ध करून दिले जात आहेत. घरातील मंगल कार्यानिमित्त खास डिझाईनचे सुवर्ण ज्वेलरी, डायमंड दागिने घेण्याचा ट्रेंड वाढला आहे. यादृष्टीने गांधी ज्वेलर्सने खास व्हरायटी उपलब्ध करून दिली आहे. मोती, माणिक, पाचुचे आकर्षक आणि एक्सूलीव्ह दागिने या प्रदर्शनात असतील. याशिवाय अनकट डायमंडची मोठी रेंज उपलब्ध असेल.

सोनं तसेच डायमंड खरेदी प्रत्येकासाठी खास असते. नगरकर चोखंदळ ग्राहक या खास खरेदीसाठी आवर्जून पुण्याला जातात. त्यांना त्यांच्याच शहरात ज्वेलरीची सर्व रेंज उपलब्ध करून देण्यासाठी गांधी ज्वेलर्सने या विशेष प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामुळे नगरकारांचा बहुमूल्य वेळ वाचून त्यांना निवांतपणे मौल्यवान खरेदीचा आनंद घेता येईल. या एक्झिबिशनला आवर्जून भेट देण्याचे आवाहन गांधी ज्वेलर्सच्या वतीने करण्यात आले आहे

## केडगाव येथून बुलेटची चोरी

नगर - केडगाव उपनगरात शाहुनगर भागात बँक कॉलनीत घरा जवळील मोकळ्या जागेत लावलेली क्लासिक रॉयल इंफिल्ड बुलेट (क्रं.एम. एच.१६ सी झेड ९६९६) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.३) पहाटे घडली आहे.

याबाबत अजित बंकटराव कातोरे (रा.शाहुनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी.एन. एस.२०२३ चे कलम ३०५ (बी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# आठरे पाटील पब्लिक स्कूल शालेय फूटबॉल स्पर्धेत अजिंक्य

नगर - शहराच्या सावेडीतील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेचा १४ वर्षांखालील मुलांचा फूटबॉल संघ आणि १७ वर्षांखालील मुला-मुलींचा फूटबॉल संघ शालेय फूटबॉल स्पर्धेत अजिंक्य राहिला. शहरातील वाडिया पार्कच्या मैदानावर क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अंतर्गत घेण्यात आलेल्या शालेय फुटबॉल स्पर्धेत शहरातील एकूण १९ शाळेच्या फूटबॉल संघाने सहभाग घेतला होता.



सावेडीतील आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या वसतीगृहात्मक शाळेचा १४ वर्षाखालील मुलांचा संघ आणि १७ वर्षांखालील मुला-मुलींचे संघ शालेय फूटबॉल स्पर्धेत अजिंक्य ठरले.

शाळेचे खेळाडू चंद अशोक, चंद भानुदास व सय्यद आफिया, पवार निलम यांनी शाळेच्या फूटबॉल संघांना विजय मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावली. आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या १७ वर्षाखालील मुलांच्या फूटबॉल संघाने उत्कृष्ट अशी कामगिरी करत उपांत्य सामन्यात ओ. ए.एस.आय.एस.इंग्लिश मीडियम शाळेच्या फूटबॉल संघाचा २-१ ने पराभव करून अंतिम सामन्यात प्रवेश केला. आणि अतितटीच्या अंतिम सामन्यात साई इंग्लिश मीडियम शाळेच्या फूटबॉल संघाचा २-० ने पराभव करून विजेता संघ ठरला. आणि विभागीय स्पर्धे साठी फूटबॉल संघाची निवड झाली.

तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या फूटबॉल संघाने सुद्धा उत्कृष्ट अशी कामगिरी करत उपांत्य सामन्यात रेसिडेन्सील हायस्कूलच्या फूटबॉल संघाचा १-० ने पराभव करून अंतिम सामन्यात प्रवेश केला. आणि आयकॉन पब्लिक स्कूलच्या फूटबॉल संघाचा ३-० ने पराभव करून मुलींच्या फूटबॉल संघाने प्रथम क्रमांक पटकावला. आणि विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच १४ वर्षांखालील मुलांच्या फूटबॉल संघानेही आपल्या कौशल्याने उत्तम कामगिरी बजावली उपांत्य सामन्यातसाई इंग्लिश मिडीयम स्कूल फूटबॉल संघाचा ४-० ने पराभव करून अंतिम सामन्यात प्रवेश केला. आणि अंतिम सामन्यात आयकॉन पब्लिक स्कूलच्या फूटबॉल संघाशी चुरशीची लढत देऊन ३-० ने सामना जिंकला.

या तिन्ही संघातील सर्व खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.अनिल आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त ॲड.विश्वासराव आठरे पाटील, सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक,पर्यवेक्षिका, समन्वयक, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले. शाळेच्या तिन्हीही फूटबॉल संघाच्या खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक संदीप दरंदले, सोनवणे शीतल यांचे मार्गदर्शन लाभले.



श्रावण पोळ्यानिमित्त अनिल दातरंगे परिवारातर्फे हिऱ्या व मोत्या बैलाचे पूजन करताना दातरंगे परिवारातील सदस्य.

# हिऱ्या व मोत्या बैलाचे पूजन करून दातरंगे परिवाराकडून पोळा साजरा

नगर - बैल मालक अनिल कारभारी दातरंगे यांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बैलपोळा साजरा केला.

नालेगाव नवग्रह मंदिर या ठिकाणी नेऊन मारुतीचे दर्शन घेतले व त्याचप्रमाणे पर्जन्येश्वर महादेव मंदिर दातरंगे मळा या ठिकाणी बैलांनी दर्शन घेतले व दातरंगे मळ्याला प्रदक्षिणा घालून थाटामाटात बैल जोडी घरी आणून त्यांची औक्षण पूजा करून बैलाला पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घालून त्यांच्या दर्शन घेतले. याप्रसंगी सर्व दातरंगे परिवार उपस्थित होते.

याप्रसंगी गुलाब कारभारी दातरंगे, दत्ता बाळासाहेब दातरंगे, अशोक दातरंगे, अक्षय दातरंगे, अविनाश दातरंगे, स्वप्निल दातरंगे, आनंद दातरंगे, शुभम दातरंगे, चंदन सूर्यवंशी, गणेश खंडागळे आदी उपस्थित होते.



मानसी डान्स स्टूडिओच्या संचालिका मानसी देठे यांनी १ ऑगस्ट ते १ सप्टेंबर महिनाभरात ७० महीलांना नृत्याचे प्रशिक्षण देऊन मंगळागौर गाण्याचा शब्दांचा अर्थाचे सहकार्य प्रतिभा देठे यांनी करुन शिबिराची सांगता झाली.

# मंगळागौर संघ व मानसी डान्स स्टुडिओ आयोजित शिबिरात महिलांनी लुटला मंगळगौर खेळ, गाणी आणि नृत्याचा आनंद

नगर - मानसी डान्स स्टूडिओच्या संचालिका मानसी देठे यांचे वतीने १ ऑगस्ट ते १ सप्टेंबर महिनाभरात ७० महीलांना नृत्याचे प्रशिक्षण देऊन मंगळागौर गाण्याचा शब्दांचा अर्थाचे सहकार्य प्रतिभा देठे यांनी करुन शिबिराची सांगता चेतना लॉन, संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे झाली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे गुलाबराव खरात (आयएएस), डॉ. सुधा कांकरिया (नोबेल शांती पुरस्कार नामांकन प्राप्त), जयंत येलूलकर (अध्यक्ष, रसिक ग्रुप), सुरेखा डावरे (संचालिका, अंजली नृत्यालय) इंजि. निलेश महाजन, डॉ. दमन काशीद, डॉ.सोनाली बांगर, डॉ. प्रशांत शिंदे, इंजि. किरण साळवे, डॉ. प्रसाद सायगावकर डॉ. नितीन जगताप आदी उपस्थित होते.

समारंभात जय देवी मंगळागौरी, सूप सूप सुपल्या, फुगड्या, गोफ विनू का गोफ, अशी गाणी नृत्यांसह विविध खेळ महिलांनी सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. तसेच इंजि.निलेश महाजन, डॉ. काशीद, डॉ. शैलेंद्र खंडागळे यांनी जुनी गाणी सादर केली.

प्रमुख पाहुण्या डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की घर काम नौकरी यातून वेळ काढून घरच्या जबाबदाऱ्या सांभाळत या सर्व महिलांनी शिबीर पूर्ण करून सुंदर नृत्य सादर केले. विसरत चाललेली चालीरिती, परंपरा नवीन पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. गुलाबराव खरात, जयंत येलुरकर, सुरेखा डावरे यांनी सांस्कृतिक क्षेत्रातील कलाबद्दल मार्गदर्शन करत आपले विचार व्यक्त केले. यानंतर उपस्थितांच्या हस्ते शिबिरातील सहभागी महिलांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

सूत्रसंचालन निवेदिका डॉ. प्राजक्ता सावेडकर आणि संगीत सितारे ऑर्केस्ट्राचे विनोद कसबेकर यांनी केले.

# पोतराज व वाजंत्री कलावंतांना शासकीय योजनेचा लाभ मिळावा

### शासनस्तरावर कलाकार म्हणून नोंद घेतली जात नसल्याने शासकीय योजनांपासून वंचित

नगर - समाजात लोककलावंत म्हणून वावरणाऱ्या दुर्बल घटकातील पोतराज व वाजंत्री कलावंतांना शासकीय योजनेचा लाभ मिळण्याची मागणी पोतराज वाजंत्री संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब उडाणशिवे, वाजंत्री जिल्हाध्यक्ष विशाल वैरागर, जिल्हाध्यक्ष लखन लोखंडे, पवन शेरकर, प्रतीक शेलकर, राहुल वैरागर, गणेश गायकवाड, विकास उडाणशिवे, विकास धाडगे, कैलास शिंदे आदींसह पोतराज व वाजंत्री कलाकार उपस्थित होते.



पोतराज व वाजंत्री कलावंतांना शासकीय योजनेचा लाभ मिळावा, या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना देताना संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब उडाणशिवे आदी.

महाराष्ट्राच्या संस्कृतीशी पारंपरिक पोतराज व वाजंत्री वर्ग जोडला गेलेला आहे. आपल्या कलेच्या माध्यमातून ते लोकजागृतीचे कार्यही करत आहे. विविध जत्रा, धार्मिक सोहळ्यात कलेचे सादरीकरण करुन ते संस्कृती जोपासण्याचे काम करत आहे. घराघरात पोहोचणारा एकमेव पारंपारिक कलावंत म्हणून पोतराची ओळख आहे. एकत्र कुटुंब, दारूबंदी, हुंडाबंदी, सार्वजनिक स्वच्छता, स्त्रीभ्रूणहत्या आदी सामाजिक विषयांवर गायन-वादन व नृत्य करुन पोतराज व वाजंत्री लोकजागृतीचे कार्य करत असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र सरकार दरबारी त्यांची कलाकार म्हणून नोंद घेतली जात नसून, त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळत नाही. आर्थिक दुर्बल घटक असलेल्या या वर्गाची सरकार दरबारी नोंद घ्यावी व शासनाच्या योजनांचा त्यांना लाभ मिळण्यासाठी संघटना आग्रही आहे.

ज्येष्ठ कलावंतांच्या मानधन योजनांचा लाभ ज्येष्ठ पोतराज व वाजंत्री यांना मिळावा, पोतराज व वाजंत्री यांना ओळखपत्र द्यावे, पोतराज वाजंत्री यांची सांस्कृतिक मंत्रालयाद्वारे महापोर्टलद्वारे कलाकार म्हणून नोंदणी केली जावी, १५ ते ३५ वयोगटामधील युवक पोतराज वाजंत्री यांना दरमहा ५ हजार रुपये द्यावे, या कलावंतांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करावे, घरकुलामध्ये राखीव कोटा दिला जावा, त्यांच्या विकासासाठी अर्थसाह्य उपलब्ध करावे, अहमदनगर जिल्हा हा सर्वात मोठा जिल्हा असल्याने वृद्ध कलावंतांसाठीचा कोटा वाढवून देण्याची मागणी पोतराज वाजंत्री संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

महागाईच्या काळात दुर्बल घटकातील पोतराज व वाजंत्री कलावंत बिकट परिस्थितीत जगत आहे. शासनाने त्यांना आधार देण्याची गरज आहे. पिढ्यानपिढ्या कलावंत म्हणून हा वर्ग समाजापुढे आहे. शासनाने त्यांच्या धोरणात बदल करुन पोतराज व वाजंत्री यांना इतर कलावंताप्रमाणे शासकीय योजनांचा लाभ द्यावा. अन्यथा पोतराज व वाजंत्री राज्यभर तीव्र आंदोलन उभे करेल, असे पोतराज वाजंत्री संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब उडाणशिवे म्हणाले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

